◆ जानेवारी २००५
◆ वर्ष पाचवे
◆ अंक पहिला

# मेहता मराठी ग्रंथजगत

✠ संपादक :
सुनील मेहता

✠ कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

✠ संपादन सहाय्य :
सुनीता दांडेकर

✠ अंकाची किंमत १५ रु.

✠ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

✠ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

*— अनुक्रमणिका —*

| | |
|---|---|
| **संपादकीय** - | २ |
| **साहित्यवार्ता** | ५ |
| **पुस्तक परिचय** | |
| **वसुंधरा** : निरंजन घाटे | २५ |
| **नवे शतक** : निरंजन घाटे | २९ |
| **ऑन द विंग्ज** | |
| **ऑफ इगल्स :** अनु.ज्योत्स्ना लेले | ३३ |
| **इंदिरा :** अनु. लीना सोहोनी | ३७ |
| **पुरस्कार** | ४५ |
| **श्रद्धांजली** | ४९ |
| **ग्रंथालयांना आवाहन** | ५० |

✠ मांडणी-अक्षरजुळणी **:**
***मेहता पब्लिशिंग हाऊस***

✠ संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**
**Website - mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*




## संमेलनाध्यक्ष केशव मेश्राम

नाशिक येथे जानेवारीच्या अखेरच्या आठवड्यात भरणाऱ्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा. केशव मेश्राम यांची बिनविरोध निवड झाली, हा त्यांच्या खडतर आयुष्यातील एक सुखद भाग्ययोगच आहे. अकोल्याच्या रेल्वेस्टेशन लगतच्या दलित वस्तीतला एक मुलगा; वडील कापड गिरणीत गासन खात्यात तर आई वायडिंग खात्यात कामगार. तिची कधीकधी इतकी धावपळ व्हायची की आपल्या पोरासाठी अंगावरचे दूध वाटीत पिळून ती ठेवून जायची आणि भुकेने पोर रडू लागले की त्याची आजी ते वाटीतले दूध त्याला पाजायची. एकत्र कुटुंब. घरात सारखा माणसांचा राबता असायचा. चुलाण्याला कधी विश्रांती नसायची. आईची सोळा बाळंतपणे झालेली. वस्तीतल्या खवखवता धूर ओकणाऱ्या चुली, कचकचत्या भांडणाचे तारशब्द, गावठी दारूचा घमघमणारा वास, कुत्र्यांच्या कलागती, माशांचे थवे, मच्छरांच्या झुंडी, डुकरांचे फौजफाटे, पत्र्यावर उड्या मारणारी माकडे, खोल विहिरीतून पाणी ओढणाऱ्या बायका, लेकुरवाळीणींच्या केसातून उवालिखा शोधणाऱ्या म्हाताऱ्या, जाडसर मोठ्या तळलेल्या पहले (पुऱ्या), कोंबडी-मटण-भात भाकऱ्यांचे चमचमीत वास - असल्या वातावरणात वाढलेला हा संवेदनाक्षम पोर शाळेत अभ्यासात हुशार. गिरणी तोट्यात गेल्याने टाळेबंदी झाली. कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली अशा वेळी खाती-वाढती पोरे रेल्वेच्या वाघिणी फोडून त्यातील माल पळवत, धावत्या मालगाडीतून मालाची पोती लंपास करीत, कोळश्याची लूट करीत... हे सर्व अनुभव घेत हा मुलगा मोठा होतो. मुंबईत कोळीवाडा-कुर्ला परिसरात पाचवी ते आठवी करून, पुन्हा तो अकोल्याला जातो. दहावी पास होतो. इंटर आर्टस झाल्यावर पुन्हा मुंबईला येतो. रेल्वेमंत्री जगजीवनराम यांच्या नव्या धोरणामुळे रेल्वेत नोकरीला लागतो. कॉलेजही चालू ठेवतो.

हा तरुण म्हणजे आजचे केशव मेश्राम. वाचनाचा नाद. लेखनात रस. स्मरणशक्ती तल्लख. शेकडो कविता तोंडपाठ. शेकडो अभंग-ओव्या पाठ. हरिविजय, भक्तिविजय वगैरे ग्रंथांची पारायणे केलेली. त्यामुळे भाषाही कमावलेली...मुंबईत त्यांना वाङ्मयीन मित्र मिळतात. अभिनव प्रकाशनचे वा. वि. भट, डॉ. सदा कऱ्हाडे, सदानंद रेगे, नारायण सुर्वे, बाबूराव बागूल वगैरेंच्या ओळखी होतात. गाठीभेटी होतात. चर्चा झडतात. प्रगत साहित्य सभेच्या निमित्ताने विविध कार्यक्रम होतात.... प्रागतिक विचार संसद संस्थेची स्थापना होते. केशव मेश्रामांचे लेखन सुरू होते. लांबलचक पल्लेदार ओळींच्या कवितांमधून, कथांमधून आपल्या आयुष्यातील घटनांचे पडसाद उमटत राहतात.



स्वत:वरला जगावरला विश्वास जेव्हा उडून जातो माऊलीची कूस बनून शब्दच मला जवळ घेतात (उत्खनन)

१९५८ पासून कविता छापून येऊन लागल्या. अकोल्यातील गरीब दलित-ग्रामीण जीवन आणि शहरातील मध्यमवर्गीयांचे आयुष्य या दोन्हीतील घुसमट, कुचंबणा, अतृप्ती, अधीरता ही त्यांना सतत जाणवत राही आणि तिला कवितेमधून वाचा फुटे. कडूगोड अनुभवांचे हे रसायन पचवताना आपल्याच अंतरंगाचा सतत शोध घेण्याचाही प्रयास चाले. त्यातून त्यांच्या जीवनविषयक धारणेची, व्यूहरचनेची जडणघडण होत गेली. दलित म्हणून अत्यंत कष्टदायक बालपण लाभूनही वृत्तिप्रवृत्तीत कडवटपणा कधी आला नाही. मुंबईतच एका गुजराती मुलीवर प्रेम जडले. लग्न झाले. त्यामुळेही तसे झाले असेल. भक्तिविजय - संतसाहित्य - रविकिरण मंडळाची कविता, मर्ढेकर-मुक्तिबोधांची कविता - या सर्वांचे संस्कार घेत स्वत:चा वेगळा बाज चोखाळत केशव मेश्रामांची कविता बेगुमानपणे आपला मार्ग शोधत राहिली. ही कविता त्यामुळेच केवळ दलित कविता म्हणून समोर आली नाही, तर ती व्यापक मराठी परंपरेचा धागा पकडूनच पुढे जात राहिली. केवळ दलित वा पददलित वर्गाच्या अनुभवविश्वातच ती अडकून पडली नाही. महानगरी मुंबईच्या बहुरंगी, बहुढंगी, व्यमिश्रतेला कवेत घेत ती एकूणच मानवतेची आराधना करीत राहिली.

महानगरीतील या सर्व अनुभवांना व्यक्त करण्यासाठी कविता हे माध्यम जेव्हा अपुरे वाटू लागले तेव्हा कथालेखनाची त्यांची उर्मी प्रबळ झाली आणि अनुभवांची एका वेगळ्या पातळीवरून मांडणी होऊ लागली. वेगळी संगती लागू लागली. 'माझे लेखन समग्र आयुष्यात घडलेल्या अनेकांच्या सुखदु:खाचा, यशापयशाचा, तिरस्कार, प्रीतीचा स्वतंत्र किरण आहे. त्यात मी थोडाफार उजळून निघतो; कारण जळूनही जातो.' असे मेश्रामांनी लिहिले आहे. या महानगरीने त्यांच्या विचारसरणीला एकांगी पक्षपातीपणापासून दूर ठेवले. दलित असूनही दलितांच्या दोषांचे चित्रण करायला ते कचरले नाहीत. अन्याय अन्याय म्हणून टाहो फोडत सहानुभूतीची भीकही त्यांनी कधी मागितली नाही.

'हकीकत व जटायू' ने केशव मेश्राम यांना मराठी साहित्यविश्वात स्वत:चे स्थान गवसले. आपल्या अकोल्यातील बालपणच्या अनुभवांचे चित्रण त्यांनी 'हकीकत' मध्ये केले आहे. 'साधने'च्या १९७० च्या दिवाळी अंकात अतिथी संपादक शंकर सारडा यांनी ही कादंबरी प्रकाशित केली आणि तिने चोखंदळ वाचकांचे लक्ष वेधून घेतले. मराठीतील हे खरे तर पहिले दलित आत्मकथन म्हणता येईल; परंतु ते आत्मचरित्रात्मक कादंबरीच्या स्वरूपात लिहिले गेले. रेल्वे वाघिणी फोडून त्यांच्यातील पार्सल्स पळवणे, दगडी कोळसा पळवणे, गरम पाण्याच्या बादल्या भरून नेणे, चुन्याच्या गुदामात काम करणे– यासारखे त्यातील प्रसंग एकीकडे अंगावर शहारे आणत; तर दुसरीकडे हृदयाला पाझर फोडत. दलित वस्तीतले ते जीवन त्यावेळच्या मध्यमवर्गीय मानसिकतेला पार हादरा देणारे होते असे बालपण खरोखर कुणाच्या वाट्याला येत असेल यावर त्यांचा विश्वास बसणेही कठिण होते...

'हकीकत व जटायू'ने केशव मेश्राम यांना मराठीतील नव्या कसदार लेखकांच्या प्रभावळीत बसवले. या कादंबरीचे अनेक भाषांमध्ये अनुवाद झाले. पुढे दलित आत्मकथनाची

लाट आली आणि दलित लेखनाला राजकीय चलनी नाण्याची किंमत आली. केशव मेश्राम यांनी मात्र या लाटेत हात धुवून घेण्याचा कधी प्रयत्न केला नाही. १९७० साली महाबळेश्वरला विभागीय साहित्य संमेलनात दलित साहित्यावर प्रथमच परिसंवाद झाला. त्यातही केशव मेश्राम यांनी आपली भूमिका स्पष्टपणे मांडली. रेल्वेतील नोकरी सोडून ते मराठीचे प्राध्यापक म्हणून तोपर्यंत स्थिरावले होते.

'पोखरण' या त्यांच्या कादंबरीला आर्य-द्रविड संघर्षापूर्वीच्या कालखंडाची पार्श्वभूमी लाभली आहे. परंतु या कादंबरीकडे वाचक समीक्षकांचे काहीसे दुर्लक्षच झाले. त्यामुळेच की काय, मेश्रामांनी नंतर कादंबरी या वाङ्प्रकाराच्या वाटेला न जाता कथा-कविता-ललितलेख-समीक्षा यावरच आपले लक्ष केंद्रित केले. जीवनातल्या भल्याबुऱ्या अनुभवांकडे साकल्याने, समग्रपणे बघून कथानकाची गुंफण करण्याची त्यांची स्वभावप्रकृती आहे. त्यामुळे वास्तवाबरोबर औचित्याचे त्यांचे भानही कायम असते. वाङ्मयीन परंपरेचे, वाङ्मयप्रकाराच्या चौकटीचे त्यांचे भानही कधी सुटत नाही. नव्या होतकरू लेखकांबद्दल त्यांना आपुलकी आहे. पाचशे पुस्तकांना प्रस्तावना लिहिल्याचे ते सांगतात. व्याख्यानांचीही शतके त्यांनी पार केलेली आहेत. त्यांच्या पल्लेदार पाठांतराने श्रोतृवर्ग स्तिमित होतो. दलित साहित्य व साहित्यकार यांच्याबद्दलही त्यांची भूमिका परखड आणि सडेतोड आहे. ''दलित समाजापैकी असणे आणि लिहिता येणे इतकेच नव्हे तर काही लिहिले म्हणून आजार झाल्यासारखे लिहितच सुटणे हे नव्या लेखकांच्या पिढीकडून तर अजिबात घडायला नको. पुस्तकांची आणि कात्रणांची संख्या मोठी झाली म्हणजे लेखक मोठा ठरत नाही. ...नामदेव ढसाळ यांचे 'आंधळे शतक' दलित-ललित साहित्याचा समर्थ आविष्कार म्हणून सांगता येईल... प्रामुख्याने आपले लेखक वाचतच नाहीत, जे वाचतच नाहीत त्यांचेही दुराग्रही समर्थन करताना आढळतात. प्रसिद्धी, पारितोषिके, अन्य लाभांची फार घाई करताना दिसतात. मराठी भाषेतल्या समकालीन विविध शाखोपशाखांचे वाचन फक्त प्राध्यापकांनीच करायचे असते, आपल्यासारख्या जिनियसला त्याची गरज काय असा क्रमही सोयीस्कररीत्या आढळतो.'' असे ते अक्षरभाकिते या पुस्तकातील 'पुन्हा एकदा दलित संकल्पनेसंबंधी' या लेखात स्पष्ट करतात. मंचावरील प्रसिद्धी, गटातटाच्या बांधिलकीच्या कल्पना आणि सत्ताधाऱ्यांच्या स्तुतिपाठकाची भूमिका याबद्दल केशव मेश्राम नाराजी व्यक्त करतात. ''छोट्यामोठ्या सांस्कृतिक कुंठितावस्था देणाऱ्या गोष्टी जाणून घेण्यासाठी कवी भटकंती करीत नाहीत, कार्यकर्ताही बनत नाहीत, स्वत:ला तासून भाजून घेत नाहीत. आपले सुरक्षा कवच सोडून नवनव्या विस्थापन समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न करीत नाहीत. म्हणून सत्तर टक्क्याहून अधिक दलित लेखन जुन्या वर्तुळात घोटाळते.'' असा इशारा ते देतात. सुस्थापित ताटव्यातून आणि संरक्षक गॉगलकवच चढवून नवनव्या दलित विस्थापितांकडे पाहणे कसे शक्य आहे असा सवाल ते विचारतात.

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात त्यांचे निखळ वाङ्मयीन भूमिकेतून केलेले चिंतन प्रकट होईल आणि दलित साहित्याच्याच नव्हे तर एकूणच मराठी साहित्याच्या आकलनाला व आव्हानाला त्यामुळे गती मिळू शकेल अशी आशा बाळगायला हरकत नाही.



# साहित्यवार्ता

## * दिनकर जोशी यांच्या ११ पुस्तकांचा लोकार्पण सोहळा

गांधीहत्येबाबत आपल्याला वाईट वाटते. पण त्यांचे विचार आणि त्यांच्या शिकवणीला आपण रोजच्या रोज पायदळी तुडवतो याबाबत आपल्याला काही वाटत नाही, हेच सर्वाधिक खेदजनक आहे. कदाचित यामुळेच आपल्याला दुसऱ्या महायुद्धापेक्षाही भीषण परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे, असे प्रतिपादन 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर यांनी मुंबई येथे केले.

प्रख्यात गुजराती लेखक दिनकर जोशी यांच्या अकरा अनुवादित पुस्तकांच्या लोकार्पण सोहळ्यात त्यांनी जोशी यांच्या बॅरिस्टर जिना यांच्यावर आधारित 'प्रतिनायक'पुस्तकाबाबत आपली मते मांडली. गांधीजींनी सभोवतालच्या परिस्थितीबाबत प्रश्न उपस्थित न करता आहे ती राजकीय परिस्थिती स्वीकारली असती तर ते कदाचित दक्षिण आफ्रिकेतून परतलेच नसते. त्यांनी प्रचंड पैसा कमावला असता आणि अंबानींच्या आधीच ते पहिले अंबानी झाले असते. त्यांनी व्यवसाय केला असता आणि तोही नीतिमत्ता राखूनच केला असता. शिवाय एनआरआयची फॅशन येण्यापूर्वीच ते एनआरआय झाले असते. दुसरीकडे गांधी परतण्यापूर्वी भारतात जिना सर्व काँग्रेसजनांचे लाडके होते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर बॅ. जिना कदाचित पंतप्रधान झाले असते आणि भारतीय उपखंडाचे भविष्यच बदलले असते, याकडेही केतकर यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. जोशी यांनी आपल्या पुस्तकात बॅ. जिना यांना 'प्रतिनायक' म्हटले आहे, खलनायक नाही. अनेक भारतीयांना ते खलनायक वाटतात, असेही केतकर पुढे म्हणाले.

जिना आणि गांधी यांच्यामधील मुख्य फरक म्हणजे जिनांची हत्या झाली नाही. गांधीजींची हत्या कोणत्याही मुस्लिम धर्मीयाने, दहशतवाद्याने केली नाही तर ती एका हिंदू चित्पावन ब्राह्मणाने केली. गांधीजींच्या याच मारेकऱ्यांनी आणि जिनांच्या अनुयायांनी भारतात प्रत्यक्ष फाळणीपेक्षाही मानसिक फाळणी उभी केली. ती आपल्याला १९९२च्या दंगलीच्या रूपाने दिसून आली. जिनांचा मृत्यू ११ सप्टेंबर १९४८ रोजी झाली. योगायोगाने २००१ साली याच दिवशी ओसामा बिन लादेनने अमेरिकेच्या 'ट्विन टॉवर'वर हल्ला केला, या दोन घटनांची काही संगती लागते का, हे पाहायला हवे, असेही केतकर म्हणाले.

गांधीजींच्या मते योग्यतेशिवाय पैसा, चारित्र्याशिवाय ज्ञान आणि नीतिमत्तेशिवाय व्यवसाय या तिन्ही गोष्टी विनाशाकडे घेऊन जातात. हीच शिकवण मला माझ्या वडिलांनी दिली, असे अनिल अंबानी यांनी आपल्या भाषणात सांगितले. मी त्यांच्याकडून माणुसकी, श्रद्धा,

विश्वास, झोकून काम करण्याची वृत्ती हे सगळे शिकलो; याच गोष्टी जोशी यांच्या लिखाणात दिसतात, असे ते म्हणाले. या कार्यक्रमात त्यांचे आध्यात्मिक गुरू रमेश ओझा, धीरुबेन पटेल, नवनीत घोणकिया, कृष्णकांत वजारिया, विश्वनाथ सचदेव, श्रवणकुमार गर्ग यांचीही भाषणे झाली.

जोशी यांच्या विविध ११ पुस्तकांचा मराठी, इंग्रजी, बंगाली, तेलुगू, हिंदी आदी भाषांमध्ये अनुवाद प्रकाशित झाला असून ही कामगिरी 'लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये नोंदण्यात आली असल्याचेही या वेळी जाहीर करण्यात आले. याशिवाय अनुवादाच्या कामासाठी अनिल अंबानी यांनी ११ लाख रुपयांचा, रमेश ओझा आणि भाईलाल पटेल यांनी प्रत्येकी ५१ हजार रुपयांचा निधी जाहीर केला.

### * 'चांगले काम करणाऱ्यांची माध्यमांकडून उपेक्षा'

''चांगले काम करणाऱ्यांची प्रसारमाध्यमांकडून पुरेशी दखल घेतली जात नाही. आपणास या माध्यमांमार्फत लोकांपर्यंत पोचता येईल, या विचाराच्या मृगजळामागे न धावता, कार्यकर्त्यांनी आता स्वत:चे नवे माध्यम शोधले पाहिजे. वृत्तपत्र वाचणे ही माझीही सवय आहे. ती सवय मोडायला मला आवडेल,'' अशी टीका ज्येष्ठ नाटककार विजय तेंडुलकर यांनी पुणे येथे केली.

'नॅशनल सेंटर फॉर ॲडव्होकसी स्टडीज'या संस्थेतर्फे 'प्रसारमाध्यमे, प्रशासन आणि नागरी समाज यांचे उत्तरदायित्व' या विषयावर चर्चासत्र झाले. ज्येष्ठ पत्रकार व लेखक अरुण साधू यांच्या बीजभाषणाने या चर्चासत्राची सुरवात झाली. श्री. तेंडुलकर अध्यक्षस्थानी होते. प्रगत विधी अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. सत्यरंजन साठे प्रमुख पाहुणे होते.

प्रसारमाध्यमांतून जे काही प्रसिद्ध केले जाते ते सामान्यांच्या दृष्टीने अपमानास्पद आहे, अशी टीका करून ते म्हणाले, ''मी वृत्तपत्र वाचतो, त्या वेळी ते माझ्यासाठी आहे काय, ते कोणाला डोळ्यांसमोर ठेवून प्रसिद्ध केले असे प्रश्न मला पडतात. केवळ इंग्रजी वृत्तपत्रांचीच नव्हे तर भाषिक वृत्तपत्रांचीही हीच स्थिती आहे. सामान्य नागरिक सोडून दुसऱ्याच कोणासाठी तरी ही वृत्तपत्रे आहेत, असे मला जाणवते. सामान्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या विषयांना वृत्तपत्रे स्थान देतात; पण तेही अपवादानेच.''

''इलेक्ट्रॉनिक माध्यमे हा वृत्तपत्रांपेक्षा मोठा व्यवसाय बनला आहे. कुठलीही वाहिनी चालविण्यामागे केवळ पैसा हाच एकमेव उद्देश दिसतो. वृत्तपत्रे आणि अन्य प्रसारमाध्यमे यांच्या मालकांचीच नव्हे तर त्यात काम करणाऱ्या पत्रकारांचीही वृत्ती बिघडली आहे. याला काही अपवाद असले तरी काही अपेक्षा ठेवून वृत्त लिहिण्याचे प्रमाण सर्रास दिसते. असेच चित्र असेल तर लोकांनी जायचे कुठे हा प्रश्न उपस्थित होतो. सध्याच्या प्रसारमाध्यमांकडून कुठलीही अपेक्षा बाळगण्यात अर्थ नाही. मालकांपासून पत्रकारापर्यंत प्रत्येक जण स्वत:च्या स्वार्थासाठी काम करताना दिसतो आहे.''

श्री. साधू म्हणाले,''प्रसारमाध्यमांचे उत्तरदायित्व तपासण्याची वेळ आली आहे. गेल्या तीस वर्षांत तंत्रज्ञानात आमूलाग्र बदल घडले; तसेच बदल प्रसारमाध्यमांची भूमिका, त्यांची मूल्ये आणि नैतिकता यांच्यातही घडले. कुठलीही जबाबदारी अथवा उत्तरदायित्व नसलेली सत्ता असे प्रसारमाध्यमांचे स्वरूप बनले आहे. राजकारण, चित्रपट, खाद्यपदार्थ यांच्याशिवाय अन्य काही विषय आहेत, यांची प्रसारमाध्यमांना जाणीवच नाही. जेव्हा शहरांतील उच्चभ्रूंना समस्या भेडसावतात तेव्हाच प्रसारमाध्यमांत नागरी समस्यांचे चित्रण येते.'' वृत्तपत्रांचे संपादक हे समन्वयक, संयोजक आणि 'ब्रँड मॅनेजर' बनले आहेत. कधीकधी ते 'बिझनेस मॅनेजर' म्हणूनही भूमिका निभावतात. हे अतिशय घातक आहे. पुणे-मुंबईसारख्या शहरांतील वाहतूक व्यवस्थेकडे तेथील प्रसारमाध्यमांचे दुर्लक्ष असल्याचे दिसते. पूर्वी पत्रकार सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करायचे. आता ते स्वत:ची वाहने वापरतात. त्यामुळे असे होत असावे. काही ठराविक वृत्तपत्रे सोडली तर अन्य वृत्तपत्रांची स्वत:च्या पत्रकारांसाठी आचारसंहिता नाही. इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे केवळ सनसनाटीपणाच्याच मागे लागलेली दिसतात. हे घातक चित्र आहे.''

### * 'एअरटेल'ची 'अस्सल मराठी' सेवा

'एअरटेल'तर्फे महाराष्ट्रातील मोबाईलधारकांसाठी 'अस्सल मराठी' ही नवी सेवा सुरू करण्यात आली आहे. मोबाईलच्या माध्यमातून वापरण्यात येणाऱ्या सर्व सेवा आता मराठी भाषेतूनही उपलब्ध होणार आहेत. त्याच्या जोडीला 'हॅलो ट्यून्स' ही 'रिंगबॅक टोन' सेवा तसेच 'मिस्ड कॉल ॲलर्ट' या दोन सेवा महाराष्ट्र-गोवा परिमंडळामध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

भारती सेल्युलर लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी ख्रिस्तोफर तोबित यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'अस्सल मराठी' सेवेच्या माध्यमातून मोबाईलधारकांना नवी-जुनी गाणी, बातम्या, क्रिकेटचे समालोचन, रिंगटोन, भविष्य आदी सर्वप्रकारची माहिती मराठी भाषेतून उपलब्ध होणार आहे. ६९६ क्रमांक डायल करून या सेवेचा लाभ घेता येईल.'अस्सल मराठी' सेवेमुळे मोबाईलधारकांना क्रिकेटच्या प्रत्येक षटकातील ताजा धावफलक आणि दर तीन तासांनी ताज्या बातम्या मराठीतून ऐकता येतील. त्यासाठी प्रतिमिनिट सहा रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे.

''महाराष्ट्र आणि गोवा परिमंडळामध्ये सध्या 'एअरटेल'चे सुमारे सहा लाख ग्राहक आहेत. यापैकी किमान ४० टक्के ग्राहक मराठी सेवेचा निश्चितच लाभ घेतील अशी अपेक्षा आहे. सध्या इंग्रजीमध्ये उपलब्ध असलेल्या याच प्रकारच्या सेवेसाठी ग्राहक दररोज १० हजार 'संभाषण मिनिटे' खर्च करत आहेत.''

### * डॉ. कोटणीस यांच्यावरील कादंबरीचे प्रकाशन

सोलापूरचे सुपुत्र डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांच्या चरित्रावर आधारित 'देवदूत' या कादंबरीचे प्रकाशन आंध्र प्रदेशचे राज्यपाल सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते १३ डिसेंबरला झाले. डॉ. संजीव शहा यांनी ही कादंबरी लिहिली आहे.

चिनी सैनिकांच्या शुश्रुषेसाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने १९३८ मध्ये पाठवलेल्या वैद्यकीय पथकात डॉ. कोटणीस यांचा समावेश होता. रुग्णांची अविश्रांत सेवा करताना तेथेच त्यांचा मृत्यू झाला.

### * पहिला मराठी - संस्कृत शब्दकोश तयार

व्यवहारात अतिशय उपयोगी ठरणारा पहिला मराठी - संस्कृत शब्दकोश 'संस्कृत-भारती'च्या महाराष्ट्र शाखेने तयार केला आहे.

संस्कृत-भारती ही संस्था संस्कृतच्या प्रचारासाठी काम करते. इतर प्रमुख प्रादेशिक भाषांतूनही या प्रकारचे शब्दकोश करण्याची संस्थेची कल्पना आहे.

महाराष्ट्र शाखेचे प्रमुख माधवराव केळकर म्हणाले, ''दैनंदिन व्यवहारात वापरात असणाऱ्या सुमारे पाच हजार मराठी शब्दांचे पर्यायी संस्कृत शब्द या कोशात आहेत. अशा शब्दांना किंवा सध्याच्या साहित्यातील शब्दांना पर्यायी संस्कृत शब्द शोधण्याची अडचण या कोशामुळे दूर होणार आहे. हा कोश १९२ पानांचा आहे. महाराष्ट्र शाखेने यापूर्वी हिंदी-संस्कृत आणि इंग्रजी-संस्कृत शब्दकोश प्रसिद्ध केले आहेत.'' संस्कृत भारती शाखेचे पंचवार्षिक अधिवेशनही झाले. तिरुपती येथील राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. मुरलीधर शर्मा अधिवेशनासाठी विशेष आमंत्रित म्हणून उपस्थित होते. 'प्राचीन भारतीय संस्कृत साहित्यातील विज्ञान,' 'संस्कृत माध्यमातून संस्कृत शिक्षण', 'प्रसारमाध्यमात संस्कृतचा उपयोग आणि संस्कृतला प्रसारमाध्यमांचा उपयोग', 'संस्कृतची पुढील काळातील दिशा' या विषयांवर अधिवेशनात चर्चा झाली.

### * पालकांची मानसिकता बदलण्याची गरज

पालक मुलांच्या आरोग्याला हानिकारक असा दीडशे रुपयांचा पिझ्झा त्यांना देतात. मात्र तेवढ्याच पैशांची त्याच्या ज्ञानात भर घालणारी पुस्तके त्यांना वाचायला देत नाहीत, ही मानसिकता बदलण्याची गरज आहे, असे मत 'आनंद' मासिकाच्या संपादिका पद्मा गोखले यांनी व्यक्त केले.

पुणे बुक फेअरमधील 'बालसाहित्य' विषयावरील कार्यक्रमात त्या बोलत होत्या. मुलांच्या मनात विविध साहित्यप्रकारांबद्दल रुची निर्माण व्हावी व वाचन संस्कृती वाढावी, यासाठी मनोरंजन व ज्ञानवर्धन या सूत्रात कार्यक्रमाची मांडणी करण्यात आली होती. कार्यक्रमात कीर्तन, दूरदर्शन व पुस्तक यावरील सांगीतिका, कथाकथन, स्वच्छतेचा मूल्यावर 'रविवार संवादाचा' हे छोटं नाटक सादर करण्यात आले. तसेच कवयित्री विमल लिमये व पद्मा गोखले यांनी आनंद मासिकातील निवडक कविता सादर केल्या.

### * 'स्त्री-पुरुष भेदभावाच्या मुद्द्यांवर निर्णय देताना संतुलन राखावे'

स्त्रीपुरुष भेदभाव करणाऱ्या मुद्द्यांवर निर्णय देताना न्यायाधीशांनी संतुलन राखावे, असे प्रतिपादन भारताचे प्रधान न्यायाधीश आर. सी. लाहोटी यांनी केले. महिलांना न्याय देताना खटले लवकरात लवकर निकालात काढावे आणि निष्फळ खर्च टाळून परिणामकारक वेगवान मार्गाने चौकशी करावी, असे त्यांनी म्हटले आहे.

राष्ट्रीय महिला आयोगाने आयोजित केलेल्या हायकोर्टांच्या मुख्य न्यायाधीशांच्या 'महिलांचे सबलीकरण : कायदाव्यवस्था आणि न्यायालयीन निर्णय' या विषयावरील पहिल्या परिषदेत लाहोटी यांनी हे मतप्रदर्शन केले. विविध आपत्तींत सापडलेल्या महिलांना पुरुषांप्रमाणेच न्याय मिळावा, जेव्हा जेव्हा महिला न्याय मागण्यासाठी किंवा एखाद्या आपत्तीच्या बळी म्हणून तुमच्यासमोर येतील, तेव्हा तेव्हा महिलांना उचित गौरवाने वागवा. आपल्या वागणुकीने त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होऊ द्या. वैचारिक प्रक्रियेतूनही त्यांना असा विश्वास मिळाला पाहिजे, असे ते म्हणाले.



सामाजिक जाणीवजागृती करण्याकरिता आणि स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी संवेदनशीलता वाढविण्याच्या दृष्टीने काम करण्याचे आवाहन त्यांनी योवेळी केले. न्यायदानाच्या प्रक्रियेतील बारकाव्यांबाबत बोलताना त्यांनी महिलांची तपासणी आणि उलटतपासणी कोर्टानेच करावी, अशी सूचना केली. तसे जमले नाही तर प्रिसायडिंग जजच्या थेट निरीक्षणाखाली या तपासण्या व्हाव्यात, असे ते म्हणाले.

### * 'मनातील वेदनांना शब्दरूप देण्याचा प्रयत्न'

''स्त्री ही स्वत: एक कविता आहे. तिच्या प्रत्येक कृतीतून कविता आकार घेत असते. पारिजात या कवितासंग्रहातील कविता या कवयित्रीच्या वेदनेला साकारणाऱ्या अशा आहेत. उमलणाऱ्या, फुलणाऱ्या अशा या कविता आहेत,'' असे उद्‌गार उमा विजय कुलकर्णीलिखित 'पारिजात' या कवितासंग्रहाचे प्रकाशन करताना महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती महामंडळाचे अध्यक्ष प्रा. रतनलाल सोनग्रा यांनी काढले.

कवयित्री उमा कुलकर्णी या मनोगतात म्हणाल्या, माझ्या अबोल स्वभावामुळे माझ्या मनातील भावनांमधून माझ्या कविता घडल्या आहेत. प्रत्येक घटना घडण्यामागे आशीर्वाद, प्रेरणा व पाठिंबा असावा लागतो.'' त्यांनी आपला हा काव्यसंग्रह आपल्या आईच्या चरणी अर्पण केला.

### * स्त्रियांकडूनच आत्मकथन, कवितांमधील मानदंड निर्माण

''पारंपरिक संस्कारांच्या बंधनांमुळे स्त्रिया आजही मनात येईल ते सारे लिहू शकत नाहीत. तरीही आत्मकथन व कविता या वाङ्मय प्रकारांतील मानदंड त्यांनीच निर्माण केले आहेत,'' असे मत कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांनी मांडले.

साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या वर्धापनदिनानिमित्त झालेल्या मेळाव्यात त्या बोलत होत्या. मंडळाच्या अध्यक्षा डॉ. मंदा खांडगे, प्रतिभा रानडे, सुरेखा शहा, साधना दधीच, शुभांगी दामले, दिलीप कुलकर्णी आदी या वेळी उपस्थित होते.

डॉ. ढेरे म्हणाल्या,''लेखिकेला स्वत:च्या घरात शिरताना तिचे लेखकपण आजही घराबाहेर ठेवूनच यावे लागते. परंपरेने स्त्री-पुरुषांसाठी निर्माण केलेल्या चौकटीपासून स्वातंत्र्य मिळणे ही दोघांचीही गरज आहे.''

प्रतिभा रानडे म्हणाल्या, ''संशोधनात्मक व ललित लेखन यांच्यात फारकत करू नये. संशोधनात्मक लेखन लोकांपर्यंत पोचण्यासाठी त्यात लालित्य असणे आवश्यक असते. संशोधन न करता लिहिलेले ललित लेखन परिणामकारक होऊ शकत नाही.''

लेखिका नीरजा, सुनीता नागरपूरकर, विमल लिमये, ज्योत्स्ना आफळे, सुवर्णा दिवेकर यांना लेखनाबद्दल पुरस्कार देण्यात आले.

### * माणूस नावाच्या देवाला शब्दांचा नैवेद्य दाखवीत आलो

''रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद यांच्यावरील प्रेमाचे भक्तीत रूपांतर झाले आणि आयुष्याचे सार्थक झाले. स्वामी विवेकानंद यांच्या जन्मशताब्दीनिमित्त व्याख्यानांना सुरवात झाली आणि तेव्हापासून माणूस नावाच्या देवाला शब्दांचा नैवेद्य दाखवीत आलो,'' असे प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी सांगितले.

'अक्षरधारा'तर्फे पुणे ग्रंथोत्सवात 'ज्ञानसूर्य रथ' या फिरत्या ग्रंथयात्रेचे प्राचार्य भोसले यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्यानंतर मिलिंद जोशी यांनी त्यांची मुलाखत घेतली.

श्रोत्यांवर व विद्यार्थ्यांवर मन:पूर्वक प्रेम करणारे प्राचार्य भोसले यांनी महाराष्ट्रात व्याख्यानमालांना उतरती कळा लागल्याचे दु:ख बोलून दाखवले. ते म्हणाले, ''माणसांनी वाचायला हवे, ऐकायला हवे, चिंतन करायला हवे. तेच आता कमी होत चालले आहे. अशा वेळी ग्रंथांची कावड घेऊन 'अक्षरधारा' घरोघर जात आहे, ही समाधान देणारी बाब आहे. बालपणी आई-वडिलांचा संस्कार, वडीलधाऱ्यांचे प्रेम मिळाले. साताऱ्यात वसतिगृहात असताना कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वाचे संस्कार झाले. शब्दशक्ती वाया दवडायची नाही, हे प्रा. ना. सी. फडके यांच्याकडून शिकलो.''

आपले उरलेले आयुष्य अनुभूतीसाठी आहे, असे त्यांनी सांगितले. आपण परमेश्वरी शक्ती मानतो. तिच्याशी संवाद साधला, तर आपले दु:ख कमी होते, अशी आपली श्रद्धा आहे. आपल्याला राजकारणात येण्यासाठी निमंत्रण आले होते. मात्र, अरविंदांचा अभ्यासक असल्याचे आपण त्यांच्यासारखेच साधनेत रमायचे ठरवले. चांगल्या लोकशाहीसाठी प्रबोधनाच्या माध्यमातून लोकमानस घडवायला हवे, असेही त्यांनी सांगितले.

### * साहित्य संस्कृती संमेलन

'सांस्कृतिक आक्रमण' ही भीती मुळातच व्यर्थ असून, न्यूनगंडातून आलेली ती 'बकवास' आहे. साहित्य आणि संस्कृतीवर कधीही कुणाचे आक्रमण होऊ शकत नाही, असे प्रतिपादन 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर यांनी केले. साहित्य आणि संस्कृतीचे जागतिकीकरण केव्हाच सुरू झाले आहे, असेही ते म्हणाले.

सुवर्णज्योती महिला मंडळ आणि युवक-युवती महासंघातर्फे आयोजित सहाव्या महिला साहित्य-संस्कृती संमेलनाचे उद्घाटन करताना केतकर बोलत होते. अभिनेत्री दीपा श्रीराम प्रमुख पाहुण्या होत्या.

साहित्य म्हणजे केवळ पुस्तके, कथा, कादंबऱ्या नव्हेत; तर नव्या काळात साहित्याचे माध्यमही बदलत जाईल, असे स्पष्ट करून केतकर म्हणाले की, साहित्याचे माध्यम बदलत गेले तरी आंतरिक भाषा हाच साहित्याचा मुख्य धागा राहील. जागतिकीकरण म्हटले की व्यापार, उद्योग, कामगार, शेती, यांचे जागतिकीकरण असा विचार होतो. पण प्रत्यक्षात साहित्य-संस्कृतीच्या माध्यमातून जागतिकीकरण केव्हाच सुरू झाले आहे. उलट 'सांस्कृतिक आक्रमणा'च्या नावाखाली या जागतिकीकरणात सध्या अडथळे आणण्याचे काम केले जात आहे. हे आक्रमण हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन या धर्मांवरही होऊ शकत नाही. हा निव्वळ न्यूनगंड आहे.

संस्कृतीवर कधीच कुणाचे आक्रमण होऊ शकत नाही. त्यामुळे सांस्कृतिक आक्रमणाची भीती व्यर्थ आहे. भारतीय संगीताला पाश्चात्य देशात स्थान मिळते तेव्हा तिकडे त्यांना आपल्यावर आक्रमण होत आहे, असे कधी वाटत नाही. भारतीय कलांचा प्रसार परदेशात होत आहे, हे काही सांस्कृतिक आक्रमण नव्हे, असेही केतकर म्हणाले. महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर यांचे साहित्य परदेशातील विद्यापीठांनी अभ्यासासाठी ठेवले व पं. बिरजू महाराजांनी नुकताच 'रोमिओ अँड ज्युलिएट' बॅले भारतात सत्तर कलावंतांसह सादर केला, याला सांस्कृतिक आक्रमण म्हणायचे का, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

साहित्य आणि संस्कृतीवर आक्रमण ही संज्ञाच चुकीची आहे, असे नमूद करून ते म्हणाले की, संस्कृतीचा विस्तार होतो. सांस्कृतिकता ही विस्तारत जाणारी आणि जगाला एकत्र करणारी गोष्ट आहे. टी. व्ही. असो, गॅट करार असो वा संगणक असो, आपल्याला प्रत्येक बदलाच्या टप्प्यावर जागतिकीकरणाची भीती वाटते. प्रारंभी लोक त्याला तीव्र विरोध करतात आणि नंतर आपण त्यांचे स्वागत करतो, हे सांस्कृतिकता गमावल्याचेच लक्षण आहे.

जीवनात आजवर खूप निरीक्षण केले आणि त्यातील जे जे भावले ते ते स्वीकारले, असे दीपा श्रीराम म्हणाल्या. लोक काय म्हणतील याचा विचार आपण सदैव करीत राहतो. त्या भीतीमुळे, संकोचामुळे व्यक्तिमत्त्वाचा विकास खुंटतो. म्हणून आपल्यातील सृजनशीलता जोपासणे आवश्यक आहे आणि तिचा विकासही आपणच करायला हवा, असेही त्यांनी सांगितले. संमेलनाच्या संयोजक, अध्यक्ष वंदना चव्हाण म्हणाल्या की, आपण स्वत:चा शोध घेताना समाजालाही काही देणं लागतो, हा विचार समजून घेऊन तो कृतिरूप करण्याचा प्रयत्न त्या संमेलनाचया माध्यमातून सुरू आहे.

### * मनोरंजन क्षेत्रातल्या संधींसाठी मॅस्टो मिडिया अभ्यासक्रम

मनोरंजन क्षेत्रात करियर करू इच्छिणाऱ्यांसाठी 'मॅस्टो' मिडिया सर्टिफिकेट अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती 'रोहन्स आय'चे रवींद्र मंकणी आणि 'मिटकॉन'उद्योजकता विकास केंद्राचे संचालक राजकुमार फटाटे यांनी दिली.

या अभ्यासक्रमात प्रशिक्षणार्थींना संहिता लेखन, पटकथा, कॅमेऱ्याचा वापर, ध्वनिमुद्रण, संकलन, निर्मिती, दिग्दर्शन, पार्श्वसंगीत, मेक-अप अशा मिडियाशी संबंधित विविध अंगांची ओळख करून दिली जाणार आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष व्यवसाय सुरू करण्याची संधी मिटकॉन्स आणि रोहन्स आयतर्फे देण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमासाठीचे शुल्क दहा हजार रुपये आहे.

या अभ्यासक्रमाचा कालावधी १५ आठवड्यांचा असून रवींद्र मंकणी, डॉ. विश्वास मेहेंदळे, सलील कुलकर्णी, राजकुमार फटाटे, संयोगिता भावे, राजेश जोशी, तरंग वैद्य असे विविध क्षेत्रातील मान्यवर या अभ्यासक्रमात शिकवतील. संपर्क - मिटकॉन कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, कुबेरा चेंबर्स, शिवाजीनगर, पुणे ५.

### * जागतिक मराठी अकादमी

जागतिक मराठी अकादमीचे दुसरे संमेलन एक जानेवारीला नगरला आयोजित करण्यात आले आहे. केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होईल. या संमेलनाचे अध्यक्षस्थान डॉ. श्रीराम लागू भूषविणार आहेत. दोन जानेवारीला मुख्यमंत्री विलासराव देशमुख व अभिनेते नाना पाटेकर यांच्या उपस्थितीत संमेलनाचा समारोप होईल. संघर्ष करीत विविध क्षेत्रांत प्रावीण्य मिळविलेल्यांच्या मुलाखतींवर संमेलनात विशेष भर देण्यात येणार आहे. त्यामध्ये आर. आर. पाटील, गोपीनाथ मुंडे, राज ठाकरे, मेधा पाटकर, प्रकाश आमटे, नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, रंगनाथ पठारे हे असतील. लंडन, दोहा, कॅनडा, ऑस्ट्रेलिया व इतर देशांतील मराठी भाषकांचीही उपस्थिती अपेक्षित आहे.

संमेलनाला परदेशात असलेल्या अनेक मराठी साहित्यिक, उद्योजक नोकरदारांसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची हजेरी असते. त्यामुळे आता दर वर्षी जानेवारीच्या पहिल्या आठवड्यातील शनिवारी व रविवारी हे संमेलन घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. महाराष्ट्र सोडून परदेशात गेलेल्यांचा परिचय नव्या पिढीला व्हावा, यासाठी या मंडळींच्या मुलाखतीही संमेलनात होणार आहेत.

*** 'टीव्ही'चा प्रेक्षक वाचनाकडे वळविण्याचा प्रयत्न हवा**

''मराठी भाषा टिकवायची असेल, तर मराठी अभ्यास परिषदेसारखे कार्यक्रम सातत्याने होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर दूरचित्रवाणी वाहिन्यांकडे वळलेला प्रेक्षक अधिकाधिक वाचनाकडे कसा वळेल यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे,'' असे आवाहन उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. एस. माळी यांनी केले.

धुळे येथील का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था व दगडाबाई चंपालालजी बियाणी शैक्षणिक विकास मंडळ यांच्यातर्फे भुसावळला भारतीय मराठी अभ्यास परिषदेच्या सोळाव्या अधिवेशनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले.

का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठानचे डॉ. जगन्नाथ वाणी (कॅनडा) अध्यक्षस्थानी होते. प्रा. केशव मेश्राम, डॉ. के. बी. पाटील, डॉ. मु. ब. शहा, प्रा. पुरुषोत्तम पाटील, स्वागताध्यक्ष बी. सी. बियाणी आदी व्यासपीठावर होते.

डॉ. माळी म्हणाले,''प्रसारमाध्यमांच्या भाऊगर्दीत आजचा माणूस हरवत जाऊन वाचनाकडे दुर्लक्ष करीत आहे. इंग्रजी शब्दांचा वाढता वापर मराठी भाषेला दूर सारत आहे. मराठी भाषा टिकविण्यासाठी मराठी साहित्य अधिवेशनासारखे कार्यक्रम नियमित होणे गरजेचे आहे. नवसाहित्यिकांनी दर्जेदार साहित्यनिर्मिती करून समाजाला दिशा व मार्गदर्शन करण्याचे काम करावे. प्रसारमाध्यमांची गर्दी वाढत आहे. लोक वाचनापासून दूर जात आहेत. ते दूरचित्रवाणी वाहिन्या पाहणे जास्त पसंत करतात. हा प्रेक्षक वाचनाकडे वळावा, यासाठी प्रयत्न होण्याची गरज आहे. साहित्याने मनोरंजन तर केलेच पाहिजे; त्याचबरोबर समाजाला नवीन दिशा देण्याचे कामही केले पाहिजे. रसिकांनी पुस्तके वाचून ज्ञान वाढविले पाहिजे. मराठी भाषेचे ज्ञान वाढवायला पाहिजे.''

प्रा. पुरुषोत्तम पाटील म्हणाले, ''आजकाल मराठी भाषेची परवड होत आहे. मराठी भाषा टिकवायची असेल, तर कविता, साहित्य अस्सल मराठी भाषेतच यायला हवे.''

प्रा. केशव मेश्राम म्हणाले,''समाजांच्या अनेक घटकांमधून भाषा तयार होते. शब्द कसे तयार झाले, यासाठी शब्दांच्या मुळाशी जावे लागते. मराठी भाषा समृद्ध होण्यासाठी मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. मात्र, सध्या ज्ञान आटत आहे. 'भाषा' ही अज्ञान व माहिती यातील 'सेतुबंध' आहे. तो जोपासला तरच मराठी भाषा जोपासली जाईल.''

*** नवोदितांच्या साहित्यासाठी खाजगी प्रकाशकांनीही पुढे यावे**

मराठी भाषेत नवोदित साहित्यिक अतिशय चांगल्या दर्जाचे साहित्य निर्माण करतात. त्यातील बहुतांश साहित्य संस्कृती मंडळाकडून प्रकाशनाची अपेक्षा करतात. दरवर्षी सुमारे सहाशे काव्यसंग्रह येत असतात. पण व्यावहारिकदृष्ट्या हे सर्व प्रकाशित करणे शक्य नसते म्हणून खाजगी प्रकाशकांनी पुढे येऊन दर्जेदार साहित्य प्रसिद्ध करावे, असे मत रतनलाल सोनग्रा यांनी व्यक्त केले.

उमा कुलकर्णी यांच्या 'पारिजात' या कवितासंग्रहाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. 'सिग्नेट पब्लिकेशन्स'ने हा कविता संग्रह प्रकाशित केला आहे.

*** मराठीप्रेमी इंग्रज**

मराठीची सध्या सर्वत्र अवहेलनाच होत आहे. मात्र इंग्रजी राजवटीत काही अस्सल इंग्रज व्यक्तीही मराठीवर प्रेम करणाऱ्या होत्या. त्यापैकी एक मेजर टॉमस कॅण्डी हे होते त्यांची १३ डिसेंबर १८०४ ही जन्मतारीख. यंदा त्यांची दोनशेवी जयंती होती.

लष्करी पेशातल्या कॅण्डी यांनी मराठी भाषेला आपली मातृभाषा मानले. तिच्या वृद्धीसाठी धडपड केली. इंग्रजी-मराठी, मराठी-इंग्रजी शब्दकोश, क्रमिक पुस्तकांचे लेखन, शालेय अभ्यासक्रमाची रचना, ग्रंथनिर्मिती यांना त्यांचे प्रोत्साहन असे. मराठीवरील त्यांच्या प्रेमामुळे लोक त्यांचा उल्लेख 'कॅण्डीसाहेब' ऐवजी 'कॅण्डीशास्त्री' असा करीत. हा मराठीप्रेमी इंग्रज अखेरपर्यंत इथंच राहिला. मराठीची नितांत सेवा त्यांनी केली.

*** माजलगावात मराठवाडा साहित्य संमेलन**

चार व पाच डिसेंबरला माजलगाव येथे सव्विसावे मराठवाडा साहित्य संमेलन संपन्न झाले. संमेलनाचे अध्यक्षपद प्रसिद्ध विचारवंत, समीक्षक, लेखक आणि चित्रकार, मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश नरेंद्र चपळगावकर यांनी भूषविले होते.

'जीवनातील भ्रष्टतेचे चित्रण मराठी वाङ्मयात अभावानेच आढळते', या विषयावर प्रा. बाळकृष्ण कवठेकर यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद झाला. त्यात प्रा. दत्ता भगत, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, प्रा. भास्कर चंदनशिव आदी सहभागी झाले होते.

दुसरा परिसंवाद 'आमच्या ग्रामजीवनाचे वास्तव प्रतिबिंब मराठी वाङ्मयात का नाही?' या विषयावर ॲड. अनंतराव उमरीकर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. डॉ. हेमलता पाटील, डॉ. जगदीश कदम, डॉ. प्रल्हाद लुलेकर, श्रीकांत देशमुख, प्रा. केशव देशमुख, प्रा. पृथ्वीराज तौर, प्रा. महेश खरात, प्रा. भगवान ठाकूर, प्रा. बबन भाग्यवंत यांचा त्यात सहभाग होता.

'नवसमाज निर्मितीसाठी संतांची शिकवण,' या परिसंवादात चैतन्य महाराज देगलूरकर, प्रा. डॉ. यशवंत साधू, बा. ल. चोथवे, परशुराम मराडे, प्रा. डॉ. विद्यासागर पाटांगणकर, प्रा. भगवान काळे, प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर, प्राचार्य अशोक खेत्री, प्रा. डॉ. मधुकर क्षीरसागर, सहभागी होते. रविवारी बालमेळावा धोंडिरामसिंह राजपूत यांच्या अध्यक्षतेखाली झाला. 'आजची प्रसारमाध्यमे वाङ्मयीन अभिरुची बिघडवीत आहेत' या परिसंवादात अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार सुधाकर डोईफोडे होते. यमाजी मालकर, दिनकर रायकर, जयदेव डोळे, श्रद्धा बेलसरे-खरकर, देवीदास फुलारी, विजय पाडळकर यांचा त्यात सहभाग होता.

*** स्त्रीने आपल्यातील शक्ती ओळखायला शिकले पाहिजे**

स्त्रीने आपल्यातील शक्ती ओळखायला शिकले पाहिजे. ती त्यागी व सेवाभावी वृत्तीने काम करू शकते. मुलांचे व कुटुंबातील इतरांचे जीवन घडविण्यासाठी ती स्वतःचे जीवन

समर्पित करू शकते. त्यासाठी तिला परिस्थितीनुसार मनाची तयारी करण्याची आवश्यकता असते, असे प्रतिपादन प्रसिद्ध अभिनेत्री स्मिता तळवलकर यांनी केले.

उरळीकांचन येथील स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानच्या हेमंतमणी व्याख्यानमालेत स्मिता तळवलकर यांची प्रकट मुलाखत प्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ यांनी घेतली.

या मुलाखतीमध्ये स्मिता तळवलकर यांनी त्यांच्या लहानपणातील काळ, महाविद्यालयीन जीवन, दूरदर्शनवर वृत्तनिवेदिका व चित्रपटात अभिनेत्री म्हणून काम करताना आलेले अनुभव सांगितले. 'अवंतिका'मालिका, 'कळत नकळत' व 'चौकट राजा' आदी चित्रपटांबाबत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे त्यांनी दिली. या वेळी त्यांनी सांगितले, ''या क्षेत्रात यशस्वीरीत्या वाटचाल करण्यासाठी चांगल्या व्यक्तींचे मार्गदर्शन लाभले, माझ्यावर चांगले संस्कार झाले. त्यामुळेच मला घरची जबाबदारी सांभाळून माझ्यातील कला जोपासता आली. प्रेमळ व कळकळ असणारे शिक्षकही मला लाभले. आज ती परिस्थिती राहिली नाही. शिक्षणासह सर्व क्षेत्राला व्यावसायिक स्वरूप आले आहे.''

### * प्रकाशकांत भेदभाव न केल्याचा दावा

सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत मराठी शाळांसाठी करावयाच्या इंग्रजी पुस्तकांच्या खरेदीसाठी देण्यात आलेल्या जाहिरातीला अनुसरून ज्या प्रकाशकांकडून पुस्तके आली त्यांची शिफारस करण्यात आली आहे, असा दावा प्राथमिक शिक्षण परिषदेच्या प्रकल्प संचालकांनी केला आहे. परिषदेने १९७३ पुस्तकांची शिफारस केली आहे याचा अर्थ ही पुस्तके त्यांनी खरेदी करावीत असा होत नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्यात ८० हजार मराठी शाळांना प्रत्येकी दोन हजार रुपये पुस्तक खरेदीसाठी दिले जातात. हा निधी अध्यापन व अध्ययनासाठी आवश्यक ते साहित्य खरेदीसाठी दिला जातो. पुस्तकांची खरेदी ही त्यापैकीच एक बाब असल्यामुळे सर्वच निधी पुस्तक खरेदीसाठी आहे, असे म्हणणे योग्य नाही, असे संचालकांचे म्हणणे आहे.

पुस्तकांसाठी एका अग्रगण्य इंग्रजी दैनिकासह पाच मराठी वृत्तपत्रांत जाहिरात देण्यात आली होती. इंग्रजी पुस्तके मागविल्यामुळे इंग्रजी प्रकाशकांचीच जास्त पुस्तके येणे स्वाभाविक होते. त्यामुळे परिषदेकडून इंग्रजी वा मराठी प्रकाशक असा भेदभाव झाला नाही, असे संचालकांनी म्हटले आहे.

### * 'स्वातंत्र्याचे मोल तरुणांनी जाणावे'

''स्वातंत्र्यसंग्रामात अनेकांनी प्राणांची आहुती दिली आहे. त्या स्वातंत्र्याचे मोल तरुण पिढीने जाणावे,'' असे प्रतिपादन प्रा. भाऊसाहेब पाटील यांनी केले.

ज्येष्ठ पत्रकार अनंतराव पाटील यांनी लिहिलेल्या 'वंदेमातरम' या पुस्तकाचे प्रकाशन त्यांनी केले. अध्यक्षस्थानी 'सिम्बॉयोसिस'चे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार होते.

प्रा. जाधव म्हणाले,''स्वातंत्र्य सहजासहजी मिळालेले नाही, याची आठवण करून देणारे पुस्तक अनंतरावांनी लिहिले आहे. स्वातंत्र्याच्या यज्ञात अनेकांनी आहुती दिल्या, याचा विसर नव्या पिढीने पडू देऊ नये. 'वंदेमातरम'मुळे तरुणांना स्वातंत्र्याचे मोल समजेल.''

अनंतराव पाटील म्हणाले, ''तरुण मुला-मुलींना स्वातंत्र्यलढ्याची माहिती नसते. क्रांतिकारकांची नावेही त्यांना ठाऊक नसतात. ज्या चळवळीत शेकडो लोकांनी संसाराची राखरांगोळी केली; त्याविषयी माहितीही न घेण्याची बेपर्वाई पाहून मला लिहावेसे वाटले. दुर्दैवाने स्वातंत्र्यसंग्रामाची माहिती देणारी पुस्तके मराठीत कमी आहेत. जे आहेत ते ग्रंथ आहेत. त्यामुळे कमीत कमी पानांत नव्वद वर्षांचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न मी केला.''

### * 'उत्तम जीवनशैलीसाठी मनुष्याने भावनांच्या आहारी जाणे थांबवावे'

''आचार, विचार, आहार व व्यवहार म्हणजे जीवनशैली असते. या उत्तम जीवनशैलीसाठी मनुष्याने भावनांच्या आहारी जाणे थांबविले पाहिजे,'' असे मत डॉ. ह. वि. सरदेसाई यांनी व्यक्त केले.

'अक्षरधारा' पुणे ग्रंथोत्सवानिमित्त टिळक स्मारक मंदिरात आयोजिलेल्या कार्यक्रमात 'जीवनशैली आणि आरोग्य' या विषयावर ते बोलत होते.

डॉ. सरदेसाई म्हणाले, ''माणसाचे त्रिमित जीवन संतुलित करणारी व्यक्ती जीवनात यशस्वी होत असते. तुम्ही किती वर्षे जगला हे महत्त्वाचे नसते, तर ते कसे जगला हे महत्त्वाचे असते. त्या जगण्यातून तुमची समाजाला आठवण राहील, असे काही कार्य केले तर ते उत्तम जीवनशैलीत इतरांसाठी आदर्श ठरू शकेल.''

श्रीविद्या प्रकाशनाचे संचालक उपेंद्र कुलकर्णी यांचा श्री. रमेश राठिवडेकर यांच्या हस्ते या वेळी सत्कार करण्यात आला.

### * आगरी महोत्सव

''ज्ञान, सामर्थ्य आणि संघटितपणा ही समाजविकासातील महत्त्वाची साधने असून, समाज सामर्थ्यवान व प्रगतिशील करायचा असेल, तर आगरी महोत्सवासारखे महोत्सव गावोगावी भरविले गेले पाहिजेत,'' असे मत ज्येष्ठ निरूपणकार नानासाहेब धर्माधिकारी यांनी व्यक्त केले.

'आगरी युथ फोरम'तर्फे डोंबिवलीत आगरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. क्रीडासंकुलात आयोजित या कार्यक्रमाला आप्पासाहेब धर्माधिकारी, बाईसाहेब धर्माधिकारी, शिवसेनेचे कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे, 'सिडको'चे अध्यक्ष नकुल पाटील व महोत्सवाचे अध्यक्ष गुलाब वझे उपस्थित होते.

श्री. धर्माधिकारी म्हणाले,''या कार्यक्रमासाठी रात्रभर अनुयायी थांबतात. दूरवरून येणारी ही मंडळी काय ऐकण्यासाठी येतात? त्यांना त्या उपदेशातून काय मिळते? त्यांना कोणी बोलविलेले नसते; तरी ही मंडळी लाखोंच्या संख्येत एका ठिकाणी जमा होतात व शांतपणे प्रवचन ऐकतात, ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे. आत्मसिद्धी व मनसिद्धी झाली की या गोष्टी होत असतात. अंधश्रद्धा हा समाजाला लागलेला एक कलंक आहे. या भोळ्याभाबड्या कल्पनांपासून दूर जाऊन प्रत्येकाने जे चांगले, समाजोपयोगी आहे ते आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रत्यक्ष कृतीतून आपल्याजवळील ज्ञान समाजाला द्या. त्या माध्यमातून समाज, राष्ट्राची प्रगती करायचा विचार करा.''

### * 'कलावंत-समीक्षकांत सौहार्दपूर्ण संबंध हवेत'

''नाट्यसमीक्षक आणि कलावंत, निर्माते यांच्यातील संबंध सौहार्दपूर्ण असणे रंगभूमीच्या व्यवहारासाठी आवश्यक असून, त्यासाठी दोन्ही बाजूंनी प्रयत्न होणे गरजेचे आहे,'' असे

प्रतिपादन ज्येष्ठ नाटककार सुरेश खरे यांनी केले.

रंगत संगत प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा माधव मनोहर पुरस्कार 'सकाळ'चे वृत्तसंपादक व नाट्यसमीक्षक सुरेशचंद्र पाध्ये यांना त्यांच्या हस्ते देण्यात आला. पाच हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

वृत्तपत्रीय समीक्षेला निर्मिते व कलावंतांकडून हेटाळणीचे स्वरूप दिले जात असल्याबद्दल चिंता व्यक्त करून खरे म्हणाले,''पुस्तकातील अनेक पानी समीक्षा लिहिण्यापेक्षा वृत्तपत्रीय समीक्षा लिहिणे अधिक कठीण असते. जागेची मर्यादा लक्षात घेऊन नाटकाची कथा, प्रयोग अशा सर्वच गोष्टींवर लिहिताना एखादा मुद्दा स्पष्ट करता न आल्याने गैरसमज होण्याची शक्यता असते. अशा वेळी 'समीक्षकाला काही कळत नाही,' असा दृष्टिकोन कलावंतांनी ठेवून उपयोगी नाही; तसेच समीक्षकांनीही आपल्या भाषेविषयी काळजी घ्यायला हवी. टिंगलटवाळीपेक्षा संयमी भाषेत दोष दाखवावेत. समतोल समीक्षेसाठी नाटककार व दिग्दर्शकांशीही चर्चा करायला हवी. समीक्षेचा प्रेक्षकांवर परिणाम होतो. मात्र, तिचा नाटकाच्या बुकिंगवर काय परिणाम होतो याचा विचार समीक्षकांनी करण्याची गरज नाही.''

श्री. पाध्ये म्हणाले, ''व्यावसायिक रंगभूमीला प्रोत्साहन मिळण्यासाठी वृत्तपत्रीय नाट्यसमीक्षा करणाऱ्यांनी जागरूकतेने अभ्यासपूर्ण लेखन करावे. याचबरोबर प्रायोगिक रंगभूमीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणाऱ्यांच्या पाठीवरही शाबासकीची थाप देण्याची गरज आहे.''

*** 'बायबल'चा द्विशताब्दी उत्सव ख्रिस्ती साहित्य संघातर्फे साजरा**

होली बायबलचे भारतात प्रकाशन करणाऱ्या बायबल सोसायटीला २०० वर्षे आणि पंडिता रमाबाई यांनी मूळ ग्रीक भाषेतून मराठीत बायबलचे भाषांतर करण्याच्या घटनेला १०० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल पुणे ख्रिस्ती साहित्य संघाने ११ डिसेंबरला ॲड. अनुपमा डोंगरे-जोशी यांच्या अध्यक्षतेखाली शिबिर आयोजित केले होते.

दूरसंचार अधिकारी शमुवेत भातंब्रे, फादर जो. मा. पिठेकर, सुनील आढाव, रेव्ह. विजय पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. 'शब्दसेवा व बायबल' या विशेषांकाचेही प्रकाशन झाले. सध्या दुर्मिळ असलेल्या बायबल प्रतींचे प्रदर्शनही भरवले होते.

*** बहुजन चळवळीला तीन हजार वर्षांचा इतिहास**

''बहुजन चळवळ आजच्या काळातच सुरू झाली, असे नसून या चळवळीला तीन हजार वर्षांपासूनचा इतिहास आहे. गौतम बुद्धांनी मांडलेले 'बहुजन हिताय'चे तत्त्व याच चळवळीचे एक अंग होते. आजच्या बहुजन चळवळीपेक्षा गौतम बुद्धांची चळवळ मोठी होती, असे निश्चितपणे म्हणता येते,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांनी पुणे येथे केले.

महात्मा जोतिराव फुले समता प्रतिष्ठानच्या व्याख्यानमालेत बोलताना डॉ. साळुंखे म्हणाले, ''सिंधू संस्कृती निर्माण करणाऱ्यांचे वारस हाच बहुजन समाज असे म्हणता येईल. संख्येने लहान पण काही अंगांनी प्रबळ व संख्येने मोठा आणि काही अंगांनी दुबळा असे दोन प्रवाह प्राचीन काळापासून आहेत. बळिराजापासून आजपर्यंत या दोन प्रवाहांमध्ये संघर्ष सुरू आहे. प्राचीन काळात फुले-आंबेडकरी चळवळीपेक्षाही मोठ्या चळवळी झाल्या, असे दिसते.चार्वाकाचे तत्त्वज्ञान हेदेखील बहुजनांचे तत्त्वज्ञान म्हणूनच ओळखले जाते. हाच प्रवाह पुढेही सुरू राहिला आणि संतांनी बहुजन चळवळ एका अर्थाने चालवली. जे बहुजन म्हणून जन्माला आलेले नाहीत, पण स्वत:च्या अधिकारांचे विसर्जन करून बहुजनांशी एकरूप झाले आहेत, त्यांनाही बहुजनच मानले पाहिजे. ज्या वेळी 'बहुजन हिताय'असे म्हटले जाते, तेव्हा काही प्रमाणात संकुचितपणाचा आरोप होऊ शकतो. कोणाला तरी वगळणे हा विचार उदात्त म्हणता येत नाही. पण तरीही गौतम बुद्धांसारख्यांनी 'सर्वजन हिताय'का म्हटले नाही, याचा विचार केला पाहिजे. भारतात चातुर्वर्ण्यावर आधारित समाजव्यवस्था होती. ज्ञानाचे, संपत्तीचे आणि सत्तेचे शोषण होत होते. अशा समाजात बहुजनांचे कल्याण पाहण्यामागे बुद्धांची निश्चित भूमिका होती. गौतम बुद्धांना स्वत:ला बहुजनांचा वारसा आहे, हे या देशातील प्रचारयंत्रणांनी बहुजन समाजाला कधी समजूच दिले नाही.''

''आमच्यावर अन्याय होतो आहे. हे बहुजनांचे म्हणणे गेल्या तीन हजार वर्षांपासून कायमच का आहे, याचाही विचार झाला पाहिजे. बहुजनांमध्ये अनेक समाज घटक आहेत ही वस्तुस्थिती असली, तरीही त्यांच्यात जे अंतर्गत ताणतणाव आहेत ते दूर करण्यासाठी गौतम बुद्धांच्या शैलीचा उपयोग होऊ शकतो. हे ताणतणाव दूर झाले नाहीत, तर बहुजनांची लढाई अवघड आहे. नव्या पिढीला सिद्धान्तांचे शिक्षण देण्याची व्यवस्था अस्तित्वात नाही. आपल्या मुलाबाळांची मने घडवण्याची जबाबदारी शोषकांच्या हाती देत असतील, तर बहुजन गुलामगिरीतून कधीच मुक्त होणार नाहीत.''

*** मध्यमवर्गीय कुटुंबातच आदर्श जीवन जगता येतं - सुधा मूर्ती**

एकमेकांवर निरपेक्षपणे प्रेम करायचं, वडिलधाऱ्यांचा आदर करायचा आणि कर्ज न घेता आहे त्या स्थितीत संसार करायचा, अशा अनेक चांगल्या गोष्टी मध्यमवर्गीय कुटुंबात पाहावयास मिळतात. त्यामुळे आदर्श जीवन जगायचं असेल, तर मध्यमवर्गीय म्हणूनच जगलं पाहिजे, असे मत इन्फोसिस फाऊंडेशनच्या अध्यक्षा व ज्येष्ठ लेखिका डॉ. सुधा मूर्ती यांनी प्रकट मुलाखतीवेळी व्यक्त केले.

स्टुंडंट्स् बुक डेपो, सांगली व मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने येथील भावे नाट्यगृहात डॉ. मूर्ती यांच्या 'गोष्टी माणसांच्या' या पुस्तकाचे प्रकाशन उर्मिला व्होरा यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी अनुवादिका लीना सोहोनी उपस्थित होत्या. प्रकाशनाच्या कार्यक्रमानंतर डॉ. सुधा मूर्ती यांच्या प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम झाला. सुधीर गाडगीळ यांनी त्यांची मुलाखत घेतली. प्रत्येक प्रश्नाला अत्यंत मार्मिकपणे उत्तर देताना त्यांनी केलेली शेरेबाजी हास्याची लहर उमटवत होती.

मुलाखतीची सुरुवात आजोबांकडून ऐकलेल्या चित्तरकथांच्या अनुभव कथनातून झाली. लेखनाची उर्मी कशातून मिळाली, या प्रश्नाला उत्तर देताना त्या म्हणाल्या, अंत:प्रेरणेतूनच लेखन झाले. लेखनासाठी कोणतीही बाह्य गोष्ट कारणीभूत नव्हती. शाळेत असल्यापासून मी कथास्पर्धेत भाग घेण्यात पुढे असायचे. त्यामुळे लहानपणापासूनच लेखनास सुरुवात झाली. अनुभव सांगताना ते शेरेबाजीतूनही मांडण्याची आपली सवय अंगभूत आहे का, या प्रश्नावर त्यांनी ती अंगभूत असल्याचे स्पष्ट केले. केवळ स्पष्टच केले नाही, तर त्याचा अनुभव अनेक उत्तरांतून उपस्थितांना येत होता. घरच्यांची इच्छा नसताना इंजिनिअरिंग

क्षेत्रात जाताना आलेले अनुभव त्यांनी सांगितले. नोकरी करताना बचत करून जमा केलेले १० हजार रुपये नारायण मूर्तींच्या व्यवसायासाठी दिले. याविषयीची माहिती देतानाच नारायण मूर्ती पुढे काही दिवसांनी एवढी मोठी व्यक्ती होईल असे वाटले नव्हते, असे सांगितले. माझे दहा हजार रुपये गहाळ झाल्यासारखे मला वाटत होते, असे त्या जेव्हा म्हणाल्या तेव्हा उपस्थितातंत एकच हशा पिकला. तुम्ही दिलेल्या शिलकीतील पैशातूनच नारायण मूर्तींना स्फूर्ती मिळाली असे तुम्हाला वाटते का, या प्रश्नावर भावूक होत त्या म्हणाल्या, त्यांच्या यशाला त्यांचेच प्रामाणिक आणि अथक परिश्रम कारणीभूत आहेत. सर्कशीत कसरती करणाऱ्यांना जसा जाळीचा आधार वाटत असतो, तसाच आधार देण्याचे वचन मी त्यांना दिले होते.

यशामागचे गमक सांगताना त्यांनी वेळेची महती सांगितली. जीवनात यश, पैसा, प्रतिष्ठा केव्हाही मिळू शकते. परंतु गेलेली वेळ कधी परत मिळत नाही. ही गोष्ट लक्षात घेऊन वेळेचे योग्य नियोजन मी करीत गेले. आज माझ्या पदरात जे काही यश आहे ते वेळेच्या नियोजनामुळेच मिळाले आहे. वैभव मिळाल्यानंतरसुद्धा दोन बेडरूमच्याच घरात राहण्यामागचे कारण काय, या प्रश्नाचेही उत्तर रसिक प्रेक्षकांची दाद मिळवून गेले. 'आपल्याला किती जागेची आवश्यकता आहे, याचा विचार आपल्या नियोजनात असायला हवा. दहा बेडरूमचं घर असलं तरी आपण एकाचवेळी दहा बेडरूममध्ये झोपू शकत नाही. त्यामुळे एवढ्या मोठ्या घराची काय आवश्यकता?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. टेल्कोचे अधिकारी असताना त्यावेळच्या पुरुष सहकाऱ्यांचे वागणे त्यांनी प्रतिकूल होते असे सांगितले. ते सर्व मला टाळत होते, तरीसुद्धा या प्रत्येक गोष्टीकडे दुर्लक्ष करून स्वत:चे खच्चीकरण होऊ दिले नाही. प्रामाणिकपणे काम करीत राहिले.




*डावीकडून लीना सोहोनी, उर्मिला व्होरा, राजेश शहा, मा. सुधा मूर्ती, सुनील मेहता, अनिल मेहता, सुधीर गाडगीळ*



खरी स्त्री शक्ती दर्शविताना स्त्री मुक्तीबद्दल तुम्हाला काय वाटते? या प्रश्नावर त्या म्हणाल्या, स्त्रियांमध्ये आत्मविश्वास असायला हवा. आत्मविश्वास असेल तर यश मिळवता येते. एवढ्या यशानंतर, वैभव मिळाल्यानंतरसुद्धा तुम्ही बाजार करताना १० रुपये खर्चतानासुद्धा चोखंदळपणा दाखवता याचे कारण काय, असा खोचक प्रश्न गाडगीळ यांनी विचारला. 'मध्यमवर्गीय म्हणून राहण्याचा मला अभिमान वाटतो. त्यामुळेच १० रुपये खर्चतानाही मी खूप विचार करते; परंतु दान देताना ते सढळपणे देते. कोट्यवधी रुपयांची देणगी देताना मी कोणताही विचार करीत नाही.' या प्रभावी उत्तराला प्रचंड टाळ्यांची दाद मिळाली.

नारायण मूर्तींच्या छत्रछायेखाली वावरताना आपले अस्तित्व हरवले आहे असे कधी वाटते का, या प्रश्नावर त्या म्हणाल्या, त्यांच्या छत्रछायेखाली राहणे मला आवडते. त्यांच्या यशात माझे यश आणि मी त्यांचाच एक भाग असल्याने माझ्या अस्तित्वाचा प्रश्नच उरत नाही.

### * बालकुमार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी गिरिजा कीर

येथे होणाऱ्या अठराव्या अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिका गिरिजा कीर यांची निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलन संस्थेचे अध्यक्ष ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा यांनी आज ही माहिती प्रसिद्धीपत्रकाद्वारे जाहीर केली. कऱ्हाडमध्ये ८-९ जानेवारी या काळात हे संमेलन होणार आहे. गिरिजा कीर यांची आतापर्यंत ८७ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. अनेक पारितोषिकांच्या मानकरी असलेल्या कीर यांनी 'अनुराधा' मासिकाचे संपादन केले. त्यांची आभाळमाया, अनिकेत, मनोबोली, दोघी आदी पुस्तके इंग्रजी व हिंदी भाषेत प्रसिद्ध झाली आहेत.

### * हरिवंशराय बच्चन यांच्या 'मधुशाला'चे मराठी भाषांतर प्रकाशित

जे साहित्य स्वत:ला आवडते ते इतरांपर्यंत पोहोचवावे, असे मनापासून वाटत असल्याने बच्चन यांची अमर 'मधुशाला' मराठीत भाषांतरीत करून मराठी रसिकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य मी केले असून मला त्याबाबत अतीव आनंद असल्याचे डॉ. माधव रामचंद्र उपाख्य नानासाहेब चौधरी यांनी सांगितले. मराठी 'मधुशाला'चे प्रकाशन नुकतेच अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलनाचे नियोजित अध्यक्ष प्रा. केशव मेश्राम यांच्या हस्ते व लोकमतचे आवृत्ती संपादक बाळासाहेब कुळकर्णी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. डॉ. नानासाहेब चौधरी पंच्याहत्तर वर्षांचे असून निष्णात शल्यचिकित्सक आहेत. यापूर्वी नानासाहेबांनी रवींद्रनाथ टागोर यांच्या 'गीतांजली' या प्रख्यात काव्यसंग्रहाचा देखील मराठी अनुवाद केला आहे.

मधुशालाचा अनुवाद तर तयार झाला; परंतु कुणीही प्रकाशक धजत नव्हता. अनुवादासाठी लेखकाची परवानगी असणे आवश्यक असते. बच्चन यांचे सुपुत्र महानायक अमिताभ बच्चन यांच्याशी योगायोगाने संपर्क झाला अन् अमिताभनी देखील लगेच आनंदाने लेखी परवानगी दिली. मधुशाला, वाचताना, ती अभ्यासताना, तिचा स्वैर अनुवाद करताना नानासाहेबांची पंच्याहत्तरी कोठेही आडवी आली नाही, हे देखील तितकेच सत्य व प्रेरणादायी आहे. ❐




# बुद्धिबळाचा श्रीगणेशा

**ना. रा. वडनप**

**बुद्धिबळाच्या पटावर घ्या जागतिक रणांगणाचे संघर्षमय दर्शन**

बुद्धिबळ हा खेळ नावाप्रमाणेच बुद्धीचे बळ कसाला लावणारा आहे; तो खेळताना वेळ कसा जातो हे कळत नाही. करमणूक तर होतेच, पण मनाची एकाग्रता, समतोलता, स्थिरचित्तता यांचीही कसोटी लागते. या जगात संघर्षाशिवाय जगता येत नाही. सर्वजण यशासाठी धडपडत असतात; त्यासाठी आपल्या वाटेत येणाऱ्यांचा, प्रतिस्पर्ध्यांचा बंदोबस्त करीत असतात. शत्रूंना नामोहरम करावे लागते. त्यासाठी केवळ शारीरिक बळ पुरे पडत नाही; तर्कशास्त्राचे, बुद्धीचे, डावपेचांचे बळही लागते. बुद्धिबळ या खेळात अशा संघर्षपूर्ण जीवनाचेच जणू प्रतिबिंब पडलेले आहे.

युद्धात प्यादी, घोडा, उंट, हत्ती यांच्या सहाय्याने वजीर आणि राजा प्रतिपक्षावर मात करण्यासाठी व्यूहरचना करतात. युद्ध रणांगणावर लढले जाते. बुद्धिबळासाठी चौसष्ट घरे असलेला पट वापरला जातो. एका खेळात प्यादे उभे आडवे वर तिरपे कसेही एक घर जाऊ शकते; हत्ती आडव्या व उभ्या चालीने कोणत्याही एका दिशेतील एका घरात जाऊ शकतो; तसे करताना वाटेत येणाऱ्या विरोधी प्याद्याला किंवा घोड्याला तो मारू शकतो. उंट एका खेळीत तिरकस चालीने एका दिशेस फक्त एकाच रंगाच्या कर्णघरातून जाऊ शकतो; वजीर आडव्या, उभ्या वा तिरक्या चालीने कर्ण घरातून जाऊ शकतो; वजीर आडव्या, उभ्या वा तिरक्या चालीने कर्ण घरातील कुठल्याही एका घरात जाऊ शकतो; उंटाच्या चालीने घोडा वा हत्ती मारून त्याच्या घरात जाऊ शकतो आणि राजा एका खेळीत लगतच्या कोणत्याही उभ्या, आडव्या पट्टीतील किंवा कर्णातील एका घरात हलू शकतो; या प्राथमिक चालींची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन बुद्धिबळाचे गुंतागुंतीचे सामने रंगत जातात. वर्षानुवर्षे, पिढ्यानुपिढ्या बुद्धिबळाचा पट खेळाडूंना आव्हान देत, चकवा देत भुलवत राहिला आहे.

बुद्धिबळाच्या या खेळीची गोडी बालवयात लागली तर ती मुले कुठल्याही क्षेत्रात चमकू शकतात; आपल्या बुद्धीच्या व कौशल्याच्या बळावर इतरांपेक्षा अधिक सहजपणे



आणि वेगाने पुढे जाऊ शकतात; अडीअडचणीच्या वेळी योग्य ती व्यूहरचना करून प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकून यशाची शिखरे गाठू शकतात.

बुद्धिबळे, बुद्धिबळाचा ओनामा, बुद्धिबळातील पेचप्रसंग, चतुरंग बुद्धिबळातील सापळे, बुद्धिबळातील चकवे, बुद्धिबळ शिका वगैरे पुस्तकांचे लेखक नागनाथ राजन्ना वडनप यांनी वयाच्या ऐंशीव्या वर्षी 'बुद्धिबळाचा श्रीगणेशा,' हे पुस्तक बालकुमारांसाठी परिश्रमपूर्वक सिद्ध केले आहे.

राम-शाम, सुधा यांच्याशी गप्पा मारत मारत त्यांचे आजोबा नाना त्यांना बुद्धिबळातील सुरुवातीच्या चालींची माहिती देत आहेत - असे त्याचे संवादात्मक स्वरूप आहे. या संवादात अधूनमधून काव्यपंक्तीही आलेल्या आहेत; आणि भरपूर आकृत्यांच्या द्वारे खेळी स्पष्ट केल्या गेल्या आहेत. त्यामुळे बालकुमारवयातील खेळाडूंना या पुस्तकाद्वारे हसत खेळत, गप्पा मारत बुद्धिबळातील प्रावीण्य मिळवणे सुलभ होऊ शकेल.

अधून मधून इतिहासकालीन दंतकथा व किस्से, उदयवर्माच्या राजाची गोष्ट, आंध्रप्रदेशातील शंकरप्पाचे चातुर्य, भोरले माधवराव पेशवे यांची गोष्ट, मीर सुलतानखानाचे कौशल्य, कराटे फेम बुद्धिबळपटू इमोचा सिंगचे वैशिष्ट्य, अमेरिकेचा अजिंक्यवीर पॉल मार्फी याचा बोलका डाव वगैरे चटकदार किस्सेही या संवादात पेरले आहेत. त्यामुळे अत्यंत रंजकपणे या खेळातले बारकावे लक्षात येऊ शकतात.

बुद्धिबळाचे तंत्रमंत्र आत्मसात करून घेण्यासाठी या पुस्तकाद्वारे तर्कसंगत प्रेरणा मिळू शकेल.

भारतात चतुरंग या खेळाचा जन्म झाला; पण आता तो बुद्धिबळाच्या रूपात इराण अरबस्तान मार्गे, चीन कोरिया जपान मार्गे, जगभर पसरला आहे; त्याचा विकास युरोप-रशिया, अमेरिका यात विशेष झाला आहे. वयाच्या केवळ पाचव्या वर्षी हा खेळ शिकलेला रशियाचा ग्रँडमास्टर गॅरी कास्पारोव्ह हा आजही जागतिक क्रमवारीत अग्रभागी आहे. वयाच्या सहाव्या वर्षापासून बुद्धिबळ खेळणारा विश्वनाथन आनंद याने अठराव्या वर्षी ग्रँडमास्टरपद हस्तगत केले; दिव्येंदू बारुआ, प्रवीण ठिपसे, अभिजित कुंटे यांनीही या क्षेत्रात आपले प्रावीण्य दाखवले; त्या सर्वांची उदाहरणे देऊनच या आजोबा-नातवांच्या गप्पांचा आरंभ होतो. पट कसा मांडावा, कसा ठेवावा, मोहऱ्याच्या चाली कशा लिहाव्या, अशा प्राथमिक बाबींपासून पुढच्या खेळी विशद करण्यात आल्या आहेत.

चतुरंगमध्ये चार खेळाडू असत; चार रंगाच्या सोंगट्या असत. आता बुद्धिबळात दोन खेळाडू आणि दोन रंगाच्या सोंगट्या असतात. या खेळाची काव्यरूपात माहिती देताना वडनप यांनी धमाल केली आहे.

**सर्वजण यशासाठी धडपडत असतात; त्यासाठी आपल्या वाटेत येणाऱ्यांचा, प्रतिस्पर्ध्यांचा बंदोबस्त करीत असतात.शत्रूंना नामोहरम करावे लागते. त्यासाठी केवळ शारीरिक बळ पुरे पडत नाही;**

*प्यादे म्हणते वजिराला, माहित आहे का तुम्हाला?*
*प्याद्याचा फर्जंद होतो, डावात चैतन्य ओततो.*
*मी सुकुमार सरळ साधी माझी चाल*
*मारतो हळूच, तिरके न करता हाल!*
*शक्तिशाली तुम्ही, आडव्या उभ्या तिरक्या चालीने*
*धावून शत्रूवर घालता घाव किती त्वेषाने!*
*टाकतो फक्त मी एक, एक*
*माघार मला ना कधीही ठाऊक*
*नाही भीत मी कदापी मरणाला*
*पाठ न दावी मी कधीही शत्रूला.*

**बुद्धिबळाच्या या खेळीची गोडी बालवयात लागली तर ती मुले कुठल्याही क्षेत्रात चमकू शकतात; आपल्या बुद्धीच्या व कौशल्याच्या बळावर इतरांपेक्षा अधिक सहजपणे आणि वेगाने पुढे जाऊ शकतात; अडीअडचणीच्या वेळी योग्य ती व्यूहरचना करून प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकून यशाची शिखरे गाठू शकतात.**

*जा ये करता तुम्ही वेगात चौसष्ट घरात*
*बदल पडतो का कधी तुमच्या रूपात!*
*पण आठव्या घरात पाऊल टाकतो मी*
*आणि रूप हिरीरीने तुमचे घेतो मी!*
*ओततो डावात चैतन्य मी,*
*विजयाची संधी मिळवून देतो मी!*

प्याद्याच्या फर्जंद होतो म्हणजे साधा सैनिक प्रधानपद मिळवतो. मराठेशाहीत शिपाई कारकून असणारे बाळाजी विश्वनाथ शाहू महाराजांना आपल्या कर्तृत्वाने प्रसन्न करून पेशवे होतात; साधा बिरबल हजरजबाबीपणाने अकबर बादशहाच्या नवरत्न दरबाराचा मानकरी होतो वगैरे गोष्टींचाही निर्देश नाना या संदर्भात करतात. कधी गमतीदार कोडीही टाकतात.

१,२,३,८,१६ इ. प्रमाणे ६४ घरापर्यंतच्या दाण्यांची संख्या $२^{६४-१}$ इतकी प्रचंड म्हणजे १८,४४६,७४४,०७३,७०९,५५१,६१५ एवढी येते हे बुद्धिबळपटू शंकरप्पाने दाखवून देऊन, आपल्या राजाला चांगलेच पेचात पकडले. एवढे धान्य साठवण्यासाठी पृथ्वीपासून सूर्यापर्यंतच्या अंतराच्या दुप्पर अंतराचे साठवण (४ मीटर × १० मीटर रुंद) लागेल. भारतवर्षावर त्याचे आवरण पावणेतीन मीटर उंचीचे होईल. या सारखा चक्रावून टाकणारा हिशेबही बुद्धिबळपटू शंकरप्पाच्या शहाणपणाची चुणूक दाखवतो.


-अशा खूप गोष्टी या पुस्तकात आहेत. पालकांनी आपल्या हुशार मुलांना हे पुस्तक आणि बुद्धिबळाचा पट व सोंगट्या बालवयातच देण्याची दक्षता घ्यायला हवी. मुलांची हुशारी वाढवण्याची ती एक रामबाण खेळी ठरेल!

**पृष्ठे : १९६ ● किंमत : १२० रु. ● सभासदांना : ८४ रु. ● पोस्टेज : २० रु.**



# प्रवास-पर्यटनाचे नवे पैलू

**यशोधरा भोसले**




**पर्यटन व्यवसायाचे भव्य स्वरूप अधोरेखित करणारे प्रेरणादायक पुस्तक**

प्रवास, पर्यटन हे शब्द उच्चारले की कुठल्यातरी वाहनाने एखाद्या निसर्गरम्य स्थळाला किंवा तीर्थक्षेत्राला धावती भेट द्यायला जायचे, तेथे एखाद्या हॉटेलात उतरायचे, तेथील प्रेक्षणीय स्थळे बघायची, तेथील वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनांची (साड्या, खाद्यपदार्थ, कलावस्तू, इ.) खरेदी करायची आणि खाण्यापिण्याची ऐश करून परत यायचे अशी दृश्यमालिका मन:चक्षुंपुढे तरळून जाते. परंतु पर्यटन हा जगातला तिसऱ्या क्रमांकाचा व्यवसाय आहे; भारताला पन्नास लाख पर्यटकांनी अमुक वर्षी भेट दिली आणि त्यापासून अमुक कोटी डॉलर्सची प्राप्ती झाली; श्रीलंका आपल्यापेक्षा खूप छोटा देश असूनही त्याला वर्षाकाठी पन्नास लाख पर्यटक भेट देतात आणि त्यापासून श्रीलंकेला भारताच्या कितीतरी पट परकी चलन मिळते, भारतातील अनेक शहरात पंचतारांकित हॉटेल्समध्ये पुरेशा रूम्स उपलब्ध नसल्याने परदेशी पर्यटक त्या शहरी जाऊ शकत नाहीत, काश्मीरमधील दहशतवादामुळे भारतीय आणि परदेशी पर्यटकांची केरळमध्ये गर्दी - अशा स्वरूपाच्या बातम्या येतात तेव्हा एक प्रचंड आर्थिक उलाढाल असणारा हा जागतिक पातळीवरचा व्यवसाय आहे आणि जेथे पर्यटकांसाठी उत्तम सुविधा उपलब्ध आहेत त्या देशाला परकी चलनाद्वारे प्रचंड लाभ होऊ शकतो हे लक्षात येते; आणि प्रवास-पर्यटन या शब्दांभोवती एक तेजोवलय झळाळू लागते. इ.स.२०१० पर्यंत एकूण जागतिक पर्यटनात भारत व इतर आशियाई देशांचा वाटा पन्नास टक्क्यांवर जाऊ शकेल; आणि एकूण पर्यटकांची संख्या १०० कोटीवर जाईल; त्याद्वारे चार कोटी रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. जागतिकीकरण आणि उदारीकरण यांच्या जोडीने व्यावसायिक तसेच मनोरंजनात्मक पर्यटनाला एकूण जागतिक अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान मिळेल.

पर्यटन म्हणजे आपल्या आवडीच्या एखाद्या स्थळाला भेट देणे एवढीच सीमित कल्पना यापुढच्या काळात बाळगून चालणार नाही. पर्यटनामध्ये नैसर्गिक स्थळांबरोबरच (समुद्रकिनारा, पर्वतशिखरे, अरण्ये, धबधबे, हिमनग, वाळवंटे, दऱ्या, बर्फाच्छादित प्रदेश) सांस्कृतिक-वांशिक-ऐतिहासिक-धार्मिक स्थळांनाही आजवर महत्त्व होते. पिरॅमिडस, देवळे,

किल्ले, मशिदी, हवेल्या, चर्चेस, शिल्पकृती, संग्रहालये, यात्रा-जत्रा, हस्तकला यांना भेटी देण्यात धन्यता वाटत असते. परंतु आता डिस्नेवर्ल्ड, कॅसिनोज, शिल्पग्रामे, आरोग्यधामे, वस्तुसंग्रहालये, अधिवेशन केंद्रे, गगनचुंबी इमारती, आयफेल टॉवरसारखे टॉवर्स, सुपर स्टोअर्स, मल्टिप्लेक्सेस, वॉटरवॉल, भव्य बगीचे, वगैरेंनाही लक्षावधी पर्यटक भेटी देतात.

सांगण्याचा मतलब हा की पर्यटनक्षेत्राला या पुढच्या काळात मोठे महत्त्व येणार आहे; आणि एक जागतिक व्यवसाय म्हणून आपल्याला खूप पूर्वतयारी करावी लागेल. अब्जावधी डॉलर्सचे परकी चलन मिळवणे आणि हजारो लाखो लोकांना रोजगार मिळवून देणे ही एका रात्रीत घडणारी गोष्ट नाही. त्यासाठी पंचतारांकित हॉटेल्स व इतर निवासव्यवस्था, खानपान सेवा; प्रवासाची जलद, विश्वासार्ह व उत्तम साधनव्यवस्था, पर्यटन स्थळांचा विकास, पर्यटन मार्गदर्शक सेवा, तत्पर दूरसंचार-संज्ञापन सुविधा, आंतरराष्ट्रीय विमानतळ, क्रेडिटकार्ड कंपन्या, टूर ऑपरेटर्स, दोन देशांमधील व्हिसा व अन्य सुविधा सुलभपणे मिळण्याची सोय, करमणुकीची साधन, संग्रहालये इ.इ.

**पर्यटनव्यवसायाचा एकूण आवाका फारच अवाढव्य आहे ही जाणीव करून देणारे 'प्रवास पर्यटनाचे नवे पैलू' हे पुस्तक मराठीत तरी पहिलेच ठरेल असे आहे.**

पर्यटनव्यवसायाचा एकूण आवाका फारच अवाढव्य आहे ही जाणीव करून देणारे 'प्रवास पर्यटनाचे नवे पैलू' हे पुस्तक मराठीत तरी पहिलेच ठरेल असे आहे.

पर्यटन विषयक प्रशिक्षण सेवा देण्याचा दीर्घकाल अनुभव असलेल्या यशोधरा भोसले यांनी हे पुस्तक लिहून दहावी-बारावीनंतरही अनेकांना सहजपणे स्वीकारार्ह वाटेल अशा या क्षेत्राचे आव्हान कसे आकर्षक आहे याकडे लक्ष वेधले आहे. वेळोवेळी वृत्तपत्रातून त्यांनी केलेल्या स्तंभलेखनापैकी निवडक ३९ लेखांचा त्या पुस्तकात अंतर्भाव आहे. इतिहास, भूगोल, पर्यावरण, धर्म, कला, शेती, मनोरंजन, कायदा, व्यवस्थापन, शिक्षण, वाहतूक, समाजशास्त्र, खाद्यसंस्कृती वगैरेंशी पर्यटनाचा कसा संबंध आहे याचा तक्ता पहिल्याच पृष्ठावर देऊन या विषयाच्या व्याप्तीची चुणूक दाखवली आहे. १९९३ सालच्या गॅट कराराची अंमलबजावणी सुरू झाली आणि १९९५ साली जागतिक व्यापार संघटनेची स्थापना झाली.

पर्यटन हा उद्योग की व्यवसाय याचा ऊहापोहही प्रारंभीच करण्यात आला आहे. पर्यटनस्थळे, आवासव्यवस्था, दळणवळणाची साधने आणि इतर सोयीसुविधा हे पर्यटन उद्योगाचे चार मुख्य घटक. त्यांचे व्यवस्थापन ही सरकारची जबाबदारी असे पूर्वी गृहीत धरले जाई. आता खाजगी कंपन्यांनीही त्यात मुसंडी मारली आहे. सरकारचा अंकुश असला तरी विमानतळ, विमानकंपन्या, बंदरे, महामार्ग, हॉटेल व निवासव्यवस्था यात खाजगी उद्योगांना आता बराच वाव मिळू शकतो.

पर्यटन आणि प्रवास यातही थोडा भेद आहे. पर्यटनाला निघालेला प्रत्येक माणूस हा पर्यटक असतो; परंतु प्रत्येक प्रवासी हा पर्यटक असतोच असे नाही. जागतिक पर्यटन संघटनेने पर्यटकाची व्याख्या करताना म्हटले आहे, **A tourist is a temporary visitor staying for at least 24 hours in a country visited for a purpose that can be classified as under :**

**a) Leisure, Health, Study, Sport, Religion etc.**

**b) Business, Mission, Family, Conventions etc.**

चोवीस तासाहून अधिक काळ एखाद्या देशात वास्तव्य करणारी, त्यासाठी पैसे खर्च करून आरक्षित केलेल्या आवासव्यवस्थेचा लाभ घेणारी व्यक्ती म्हणजे पर्यटक. मग त्या भेटीचा उद्देश वर दिलेल्यापैकी कोणताही असो. पर्यटक हा त्या देशाचा रहिवासी नसतो; किंवा तेथे नोकरीधंदाही करीत नाही. एखाद्या देशात २४ तासापेक्षा कमी वेळ घालवणाऱ्यांना ट्रॅन्झिट पॅसेंजर म्हणतात. नोकरीपेशानिमित्त परदेशी राहणारे अनिवासी लोक हे इमिग्रंट - परदेशवासी मानले जातात. तेही पर्यटक या व्याख्येत बसत नाहीत.

**पर्यटन हा उद्योग की व्यवसाय याचा ऊहापोहही प्रारंभीच करण्यात आला आहे. पर्यटनस्थळे, आवासव्यवस्था, दळणवळणाची साधने आणि इतर सोयीसुविधा हे पर्यटन उद्योगाचे चार मुख्य घटक.**

भौगोलिक आकर्षणे (समुद्र, नद्या, धबधबे, कालवे, समुद्रकिनारे, जंगले, गवताळ प्रदेश, पर्वत, वाळवंटे, ज्वालामुखी, वन्य प्राणी, पक्षी, जलचर सृष्टी, बर्फाच्छादित शिखरे, सूर्यप्रकाश, ग्लेशियर्स इ. आणि मानवनिर्मित आकर्षणे (ऐतिहासिक वास्तू, उत्खननात सापडलेले अवशेष, वाडे, किल्ले, मशिदी, देवळे, कलादालने, संग्रहालये, करमणूक केंद्रे, उद्याने, हस्तकला, क्रीडास्पर्धा, कला, धर्म-रुढी-परंपरा, जत्रा-यात्रा, औषधोपचार, शिक्षण, संशोधन, खाद्यसंस्कृती, कॅसिनोज, डिस्नेवर्ल्ड इ.) ही पर्यटकांना आवाहन करीत असतात.

प्रवासाचे उद्देशही भिन्नभिन्न असू शकतात.

पूर्वी तीर्थयात्रा, संस्कृतिक्षेत्रांना भेटी, अज्ञात प्रदेशाचा शोध, परदेशातील संपत्तीचे आकर्षण, साहस वगैरे कारणांनी माणसे प्रवासाला निघत; आता दळणवळणाची मुबलक साधने, संचारमाध्यमातून घडणारे अन्य देशांचे विलोभनीय, दर्शन, बाह्यजगाबद्दलचे कुतूहल, प्रतिष्ठा व विश्रांतीची बदलती संकल्पना, फॉरिन रिटर्न्ड म्हणवून घेण्यातले थ्रिल, आंतरराष्ट्रीय परिषदा व चर्चासत्रे, विशिष्ट विषयाच्या अभ्यासाच्या सुविधा, सांस्कृतिक वैविध्य, चित्रपट-नृत्य-नाट्य आदी क्षेत्रांना लाभलेले जागतिक स्वरूप, पर्यटनासाठी कंपन्यांकडून मिळणारे अनुदान, पर्यावरणाचे वैविध्य, साहसी क्रीडास्पर्धा, विविध प्रकारच्या पदार्थांचा आस्वाद घेण्याची ओढ, साहसी गिर्यारोहण व जलविहार यांचा आनंद घेण्यासाठीही पर्यटक जगभर भ्रमण करीत असतात.

पर्यटन हा 'अदृश्य' निर्यात उद्योग आहे; त्यावर होणारी कमाई ही निव्वळ नफा

ठरते. आंतरराष्ट्रीय संबंध-सामंजस्य हे राजकीय-सामाजिक सांस्कृतिक संपर्काला पोषक ठरते. भिन्नजीवनशैलींचा परिचय झाल्याने संघर्षाची धार बोथट होत जाते. काही वैशिष्ट्यपूर्ण व्यक्ती, संस्था व अनुभव एखाद्या व्यक्तीच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणू शकतात; याकडेही यशोधरा भोसले यांनी लक्ष वेधले आहे. भारतीय चित्रकलेलाही आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता लाभलेली आहे. काही कलाप्रेमी पर्यटक नियमितपणे भारताला भेट देऊन येथील नव्या कलाकृतींचा आस्वाद घेत असतात. श्रीमंत पर्यटक आपली चित्रे विकत घेऊन संग्रही ठेवतात. हुसेनसारख्या चित्रकाराच्या एकेका चित्राला कोटी कोटी रुपये मिळतात.

यशोधरा भोसले यांनी केरळ, बंगाल, ओरिसा, गुजरात, मुंबई, गोवा, श्रीलंका, चीन, इंडोनेशिया येथील पर्यटन सुविधा वा त्रुटी यांच्याकडे लक्ष वेधले आहे.

**पर्यटन आणि प्रवास यातही थोडा भेद आहे. पर्यटनाला निघालेला प्रत्येक माणूस हा पर्यटक असतो; परंतु प्रत्येक प्रवासी हा पर्यटक असतोच असे नाही.**

पर्यटन मंत्रालय, पर्यटनकेंद्रे, पर्यटन विकास महामंडळ, पंचतारांकित हॉटेल्स, पर्यटन व्यावसायिकांच्या संघटना, जागतिक पर्यटन संघटना, भारतीय विमानतळ, यांचीही माहिती देऊन या व्यवसायाच्या विकासासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची प्रचंड गरज आहे हे पुन:पुन्हा अधोरेखित केले आहे. पर्यटकांना येणारे हलगर्जीपणाचे व अडचणीचे अनुभव, राजकीय अस्थिरता, जातीय संघर्ष व अशांतता यामुळे या व्यवसायाला खीळ बसते, भारताची प्रतिमा डागाळते. त्यासाठी काही पथ्ये पाळणे आवश्यक आहे.

पर्यटनव्यवसायामुळे हजारो तरुणांना रोजगार मिळेल यात शंकाच नाही. मात्र त्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे. हे रोजगार कुठले कुठले असू शकतील याची थोडीशी कल्पना यावी म्हणून काही तपशील येथे द्यावेसे वाटतात.

१. खास आवासशृंखलांसाठी - स्वागतिका, स्वागतकक्ष व्यवस्थापक, बेलबॉय, बेलकॅप्टन, लेखापाल, रोखपाल, अतिथी संपर्क अधिकारी, खानपानसेवा - बार व्यवस्थापक, आचारी, वेटर्स, उपहारगृह व्यवस्थापक, विपणन प्रतिनिधी, सुरक्षा कर्मचारी, सुविधा व्यवस्थापक, मद्य व इतर सेवा सल्लागार, आदरातिथ्य प्रशिक्षक, आहारयोजना तज्ज्ञ, खरेदी व स्टोअर्स व्यवस्थापक, औषधोपचार / आरोग्य केंद्र प्रमुख.

२. हवाई सेवा, रेल्वेसेवा - स्वागतिका, तिकिट विक्री व आरक्षण, संगणकीय सेवा संचालक, विमानतळ कर्मचारी, चेकइन कक्ष, उड्डाणांतर्गत सेवा, हवाई सुंदरी, वैमानिक, सहवैमानिक, विकी अतिथी संपर्क अधिकारी, जनसंपर्क व प्रसिद्धी अधिकारी.

३. पर्यटन मंत्रालय - पासपोर्ट, व्हिसा, विमा कर्मचारी वर्ग, परकीय चलन कर्मचारी, विपणन, आरक्षण कर्मचारी, व्यवसाय पर्यटनतज्ज्ञ, विमानतळ प्रतिनिधी, सफर संयोजक, मार्गदर्शक, व्यवस्थापक, टूर ऑपरेटर्स, ट्रॅव्हल एजन्टस.

४. इतर - कार्यक्रम व्यवस्थापन, उपाहारगृहे, कालबद्ध निवास योजना - खाजगी वाहन व्यवस्था, भाषांतरकार, दुभाषे, पर्यटन शिक्षक - प्रशिक्षक, समुद्रपर्यटनतज्ज्ञ, प्रवासलेखक, पत्रकार, स्कीइंग, स्कूबा इ. प्रशिक्षक, अतिथीगृह व्यवस्थापक.

हे कोर्सेस चालवणाऱ्या अनेक संस्था आहेत. त्यांची यादीही पुस्तकात देण्यात आली आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टुरिझम अँड ट्रॅव्हल मॅनेजमेंट, ग्वाल्हेर, या संस्थेतर्फे एमबीए,डिप्लोमा, पदव्युत्तर डिप्लोमा वगैरे अनेक अभ्यासक्रम चालवले जातात. गिर्यारोहण, हॉटेल मॅनेजमेंट व कॅटरिंग टेक्नालॉजी, टूरिझम अँड ट्रॅव्हल मॅनेजमेंट यांचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था लहानमोठ्या शहरात सर्वत्र आहेत. प्रशिक्षित व्यक्तींना लगेच नोकरी मिळू शकते. कारण त्यांची संख्या आजही मोजकीच आहे.

पर्यटनाकडे एक व्यवसाय म्हणून पाहण्याची दृष्टी देणारे आणि या व्यवसायातील विपुल आव्हानांची कल्पना देणारे हे पुस्तक तरुणवर्गाला प्रेरणादायक ठरेल.

**पृष्ठे : २४० ● किंमत : १५० रु. ● सभासदांना : १०५ रु. ● पोस्टेज : २० रु.**


www.mehtapublishinghouse.com


**प्रत्येक पुस्तकाची सविस्तर माहिती असलेली संपूर्णपणे मराठी असलेली वैशिष्ट्यपूर्ण वेबसाईट.**

**केवळ सहा महिन्यातच ११००० ग्राहकांनी साईटला भेट दिली आहे!**
कॅलिफोर्निया, व्हर्जिनी, न्यूजर्सी, वॉशिंग्टन, न्यूयॉर्क, व्हिस्कोसिन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, युनायटेड किंग्डम, हाँगकाँग, सिंगापूर, तैवान, युनायटेड अरब अमिराती, जर्मनी इत्यादी जगातील विविध भागांबरोबरच भारतात व महाराष्ट्रात ही साईट सर्वाधिक लोकप्रिय ठरली आहे.

**आमच्या वेबसाईटची ठळक वैशिष्ट्ये**

- संपूर्णपणे मराठी असलेली वेबसाईट
- लेखकांच्या नावांनुसार, वाङ्मयप्रकारानुसार,पुस्तकाच्या नावानुसार पुस्तके 'सर्च' करण्याची सुलभ सुविधा
- पुस्तकांची संपूर्ण यादी अकारविल्हे पाहण्याची सोय
- प्रत्येक पुस्तकाचे संपूर्ण स्वरूप स्पष्ट करणारी, पुस्तकाचा सारांश तसेच पुस्तकातील निवडक भाग व वृत्तपत्रीय परिक्षणे या स्वरूपातील सविस्तर माहिती
- आपल्या आवडीनुसार नवीन पुस्तकांची माहिती इमेलद्वारा त्वरित पाठवण्याची तत्पर सेवा
- आपल्या पसंतीच्या लेखकांबद्दलची माहिती
- आमच्या सवलत योजनांची सविस्तर माहिती
- क्रेडिट कार्डद्वारा ऑनलाइन शॉपिंगची सुविधा

**आजच भेट द्या. व आपली मागणी नोंदवा.**




# मुग्ध कहाणी प्रेमाची

**अनु. मीना टाकळकर**

## कबीरांच्या तत्त्वज्ञानाचे ओशोंनी उलगडून दाखवलेले अमोघ मर्म

ओशोंनी 'गुंगे केरी सरकरा' आणि 'कहे कबीर मैं पूरा पाया' या दोन हिंदी पुस्तकांमध्ये कबीराच्या शिकवणीचा रसाळ मागोवा घेतला आहे. त्या दोहोंचे एकत्रीकरण करून मीना टाकळकर यांनी 'मुग्ध प्रेमाची कहाणी' हे पुस्तक मराठीत सिद्ध केले आहे.

कबीरांच्या दोह्यांमध्ये सुफी प्रेममार्ग, कुंडलिनी जागरण योग, हटयोग, जपयोग, अद्वैत दर्शन या सर्वांचा समन्वय झालेला दिसतो. कबीरांचे काव्य हे समन्वयवादी आहे. कवी, साधक, सिद्ध, संत, हटयोगी, प्रेममार्गी, समन्वयवादी, समाजसुधारक, आत्माभिमानी, उच्छृंखल, स्वैराचारी, रहस्यवादी, अशी त्यांची रूपे वेगवेगळ्या चाहत्यांना जाणवत आलेली आहेत. रामानंदांकडून कबीरांनी दीक्षा घेतली होती, पण ते कोणत्याही धर्मसंप्रदायात अडकून पडले नाहीत. म्हणूनच हिंदू आणि मुसलमान दोघांनाही ते आपले वाटतात. उत्तर भारत आणि दक्षिण भारत यातील तत्कालीन संतांमध्येही एक दुवा म्हणून त्यांचे स्थान मोलाचे आहे. कबीर हे पढिक पंडित नव्हते; आपल्या अनुभवाच्या संचितावरच त्यांचा भर आहे. ओशो म्हणतात,'' कबीरांच्या समोर उपनिषदे फिकी पडतात. वेद दयनीय वाटू लागतात. ''भगवान बुद्धापेक्षाही कबीर अधिक यशस्वी आहेत'' असे ते मानतात (५०)

ओशोंनी कबीराच्या रहस्यमय, गूढ, कुटिल प्रतिभेचे, अनुभूतीचे आणि काव्याचे सौंदर्य अत्यंत आत्मीयतेने न्याहाळले आहे आणि त्यांच्या पदांवर अंत:स्पर्शी भाष्य केले आहे. संस्कृत काव्यशास्त्राच्या चौकटीत बसणारे कबीरांचे काव्य नाही; त्यातील आत्मानुभूती विलक्षण प्रत्ययकारक आहे; आणि तिच्यावरच त्यांच्या जीवनशैलीची आणि जीवनविषयक भूमिकेची उभारणी झालेली आहे. ओशो आपल्या मिस्किल शैलीत म्हणतात की **''कबीर खतरनाक आहेत. वेद, कुराण, बायबल सगळे गोंधळात पडतील.''** कबीरांना कानफाटा योगी असे कोणी म्हटलेले नसले तरी ते नाथपंथीयांमध्ये मोडतात, असेही म्हणणे गैर ठरणार नाही. चमत्कार न दाखवताही कबीर तंत्रसिद्ध व सिद्ध तांत्रिक होते. एकात्मबोधाच्या साक्षात्कारी अनुभूतीमुळे ते कधी कधी गूढ काही बोलून जातात; सहज समाधीत जातात. ज्ञाता-ज्ञान-ज्ञेय, तेच बनतात. शून्यात जातात. शून्यापलीकडे जातात. कबीरांच्या गूढरहस्यमय चिंतनाचे मर्म ओशोंच्या विवेचनातून सुलभपणे प्रतीत होते.

प्रेमाची न सांगितलेली गोष्ट, लिहिलेली नसून बघण्याची गोष्ट, दुलहनी गाव हुं मंगलाचार, नवरानवरी मिळाले - वरातीची गरजच काय?, योग्य जीवन-योग्य मृत्यू, ज्याने जाणलंय त्यालाच सत्य कळाले, सद्गुरूचा तेजोमय प्रकाश अशा सात प्रवचनांमध्ये ओशोंचे कबीरांवरील हे भाष्य सामावलेले आहे.

*प्रेम न बाडी उपजै, प्रेम न हाट बिकाय । राजा परजा जेहि रुचै, सीस देय लै जाय''*

''प्रेम शेतात उपजत नाही, प्रेम बाजारात विकत मिळत नाही. प्रेमाच्या दुनियेत राजा आणि प्रजा असा भेद नसतो. ज्याला कुणाला प्रेम हवे आहे त्याला स्वत:ला विसरावे लागते. शिर द्यावे लागते.'' यावर भाष्य करताना ओशो प्रेमाचे अनेक पैलू स्पष्ट करतात. प्रेमाचा अर्थ आहे - स्वचे रूपांतर ''मी या जगाचा केंद्रबिंदू आहे; मी सर्व काही आहे'' असे मानणाऱ्या व्यक्तीला प्रेम करताच येत नाही. प्रेमाचा अर्थ आहे दुसऱ्याला आपल्या जीवनाचे केंद्र बनवणे. दुसऱ्यासाठी जगणे. दुसऱ्यासाठी स्वत:लाही संपवून टाकणे.

**प्रेमाचा अर्थ आहे - स्वचे रूपांतर ''मी या जगाचा केंद्रबिंदू आहे; मी सर्व काही आहे'' असे मानणाऱ्या व्यक्तीला प्रेम करताच येत नाही. या प्रेमाचा अर्थ आहे दुसऱ्याला आपल्या जीवनाचे केंद्र बनवणे. दुसऱ्यासाठी जगणे. दुसऱ्यासाठी स्वतःलाही संपवून टाकणे.**

बायका नवऱ्याला आपल्या बोटावर नाचवायचा प्रयत्न करतात तर नवरे बायकांना आपल्या मुठीत ठेवायचा प्रयत्न करतात. त्यामुळे वैवाहिक जीवनात सतत संघर्ष दिसतो. लग्नामुळे होणारे संघर्ष कधी संपतच नाहीत. ते कधी संपणार नाहीत. मालकीत हिंसेचा भाव आहे. त्यात प्रेमाचा लवलेशही नाही. तुम्ही पत्नीवर/पतीवर प्रेम करूच शकत नाही. मग मुले जन्माला आली की त्यांच्यावरही तुमचा मालकी हक्क प्रस्थापित करून त्यांना दाबण्याचा तुमचा प्रयत्न चालू होतो. तुम्ही त्यांच स्वत्वच संपवू पाहता. कारण त्यांचे स्वातंत्र्यही तुम्हाला धोकादायक वाटू लागते. तुम्ही मुलाला खच्ची करून टाकता; आणि वर तो आज्ञाधारक आहे म्हणून मिरवू पाहता. पण खरे तर आईवडील ज्या मुलांना आज्ञाधारक म्हणतात ती मुले जन्मभर मिळमिळीत जिणे जगत असतात...

प्रेमाचा अर्थ आहे आपल्या अहंकाराचे विसर्जन. जर तुम्ही मुलाच्या पायाशी आपल्या अहंकाराचा त्याग कराल तर मुलगाही तुमच्यासाठी आपला अहंकार सोडताना दिसेल. एरव्ही मुलगाही दु:खीकष्टी राहील आणि तुम्हीही असमाधानी राहाल - हा कर्माचा नियम आहे, असे ओशो सांगतात.

अहंकाराचा त्याग केला की प्रेमाचा वर्षाव होऊन अवघे जीवन हिरवेगार होऊन जाते. 'अंतर भीगी आत्मा हरी भाई बनराई;' परमेश्वर तुमच्या अंत:करणात भरून गेला की अहंकार बाहेर फेकला जाईल.

'वेद कुराना ना लिखी' वेदकुराणात न लिहिलेली गोष्ट कबीर सांगतात; त्या गोष्टीला ते अद्भुत मानतात. पण कुराणात न लिहिलेली, वेदांत न आलेली ही कथा - तिच्यावर कोण विश्वास ठेवणार असा प्रश्न ते विचारतात. वेदात ही गोष्ट असती तर हिंदूंनी मानली

असती; कुराणात असती तर मुसलमानांनी मानली असती. असा तर्क लढवून ही धर्माची गोष्ट जे हिंदू-मुस्लीम वा अन्य धर्मीय नाहीत तेच मानतील असे ओशो लक्षात आणून देतात.

ओशो त्याही पुढे जाऊन एक धाडशी विधान करतात. ते म्हणजे **धर्माला कोणतेही नाव नाही. धर्म विशेषणरहित आहे. नावे संप्रदायांना असतात; आणि संप्रदाय हे कोणत्या तरी एका पैलूवर भर देतात.** ''कबीर म्हणतात की तुम्ही रितेपणा वा भरून जाणे या दोन्हींवर जोर देऊ नका; मध्यभागी थांबा. दु:ख आले. दु:खाला सामोरे जा. रडू नका. सुख आले. सुखाकडे शांतपणे बघत राहा. ते पकडून ठेवण्याचा प्रयत्न करू नका...मग तुमच्या लक्षात येईल की तुम्ही दोन्हींच्याही पलीकडे आहात. हा जो पलीकडचा आहे, तोच परब्रह्म आहे. (५२)''

'हम घरि आए हौ राजा राम भरतार। ... कहै कबीर हम ब्याहि चले है पुरुष एक अविनासी' या पदात कबीर स्वत:ला प्रेयसी मानतात आणि रामाला पती... पुरुष. तुमच्या आतील सीता बाहेरच्या रामाला मिळते त्याक्षणी सगळे चराचर विश्व उत्सव साजरा करते. सगळे अस्तित्व हे मीलन बघण्यासाठी हजर होते. अठ्ठावीस हजार सिद्धी आणि तेहतीस कोटी देवता ही परम घटना बघण्यासाठी उपस्थित होतात. तुमच्या धन्यतेत सारे चराचर अस्तित्व धन्यता मानते.

**अशा प्रकारे जगा की पुन्हा जन्मच होणे नाही. अशा प्रकारे मरा की पुन्हा मरणे नाही. सम्यक जीवन हा सम्यक मृत्यूचा आधार आहे.**

प्रेम म्हणजे गूढ मृत्यू; जोपर्यंत तुम्ही मिटत नाही तोपर्यंत प्रेमाचा अंकुर फुलणार नाही... मरते मरते जग मुआ, औरस मुआ न कोय. जोपर्यंत प्रेमी आहे तोपर्यंत प्रेम नाही. प्रेम म्हणजे महामृत्यू. मृत्यू पावलेला पुन्हा जन्माला येऊ शकतो. पण प्रेमामध्ये मेलेला माणूस पुन्हा परत येत नाही. त्याला परत येण्यासाठी काही शिल्लक उरत नाही.(८०) ज्याला पुन्हा परत यायचे आहे त्याचे मरणे हे मरण नाही. जग दररोज मरते आहे. मृत्यू रोज होत आहेत. जो मृत्यूमध्ये उत्तीर्ण होतो, त्याच्यासाठी शिकण्यासारखे काही उरत नाही. अशा प्रकारे जगा की पुन्हा जन्मच होणे नाही. अशा प्रकारे मरा की पुन्हा मरणे नाही. सम्यक जीवन हा सम्यक मृत्यूचा आधार आहे. (९५) कबीर अशा मृत्यूला परम जीवनाचा क्षण मानतात; त्यात आनंद अनुभवतात.

सत्य हे आपल्या आकलनशक्तीपेक्षा मोठे असते; ते आपल्या थिट्या आकलनशक्तीच्या कक्षेबाहेर राहते. सत्याला आपल्या आकलनाच्या कक्षेत आणणे म्हणजे आकाशाला मुठीत पकडण्याचा प्रयत्न करणे. म्हणून तुम्ही सत्याला पक्षात बांधून घेऊ पाहता. सत्य घेऊन जगता येणे शक्य नसते.(१२०)

'कहै कबीर सुनो भाई साधो, सतगुरु नूर तमाम.' असे सांगून कबीर गुरूचे महत्त्व मनावर ठसवतात. परमेश्वराच्या शोधामध्ये गुरू हा मधला पडाव आहे. मार्गदर्शक आहे. गुरू भेटला की तुम्ही तेजोमय होऊन जाल. प्रकाशच प्रकाश होऊन जाल. गुरू हा एक चमत्कार आहे.''

ओशो गुरूला दह्यासारखे मानतात.एक चमचाभर दही दुधाचे दह्यात रूपांतर करते.दुधाला दूधच राहू दिले तर दूध नासते. फाटते मृत्यूच्या वेळी प्रत्येक माणसाची हीच अवस्था होते. तुम्ही लौकर दही न बनला तर असेच फाटून जाल.



दही बनण्यासाठी तुमच्यामध्ये थोडे तरी दही घालावे लागेल. दही बनला की त्यापासून लोणी बनते. लोण्यापासून तूप बनते. मग कोणाच्या आधाराची गरज उरत नाही.

फाटण्यापूर्वीच तुम्ही दह्याला आत्मसात केल तर तुमच्या जीवनात क्रांती घडेल. म्हणून गुरू दह्यासारखा आहे.

ओशोंनी कबीरांच्या तत्त्वज्ञानाच्या गाभ्यालाच हात घातला आहे आणि त्यातील काही प्रमुख सूत्रे आपल्या अमोघ शैलीतून आस्वाद्य करून दाखवली आहेत.

ओशोंच्या विवेचन पद्धतीची अन्य वैशिष्ट्येही या प्रवचनांमध्ये प्रकट झाली आहेत. एखादा मुद्दा मांडताना ओशो समर्पक असा दृष्टान्त देतात; एखादा किस्सा सांगतात आणि त्याद्वारे आपली भूमिका स्पष्ट करतात. प्रेम म्हणजे मोकळेपणा. त्यात धोका असला तरी जिवंतपणा आहे. हे सांगण्यासाठी ओशोंनी दिलेला दाखला बघा.

**परमेश्वराच्या शोधामध्ये गुरू हा मधला पडाव आहे. मार्गदर्शक आहे. गुरू भेटला की तुम्ही तेजोमय होऊन जाल. प्रकाशच प्रकाश होऊन जाल. गुरू हा एक चमत्कार आहे.**

एका राजाने स्वत:च्या रक्षणासाठी एक महाल बनवला. फक्त एकच दरवाजा ठेवला. खिडकी ठेवलीच नाही. शत्रूला लपूनछपून आत प्रवेश करणेच अशक्य. त्याचा तो महाल बघायला शेजारचा सम्राट आला. तो भक्कम सुरक्षित महाल बघून तोही प्रभावित झाला. फक्त एकच प्रवेशद्वार. त्यावर पहारेकरी. एका पहारेकऱ्यावर दुसरा पहारेकरी. मग त्यावर तिसरा पहारेकरी... लांबच लांब साखळी. मीही असाच महाल बनवीत असे दुसरा सम्राट म्हणाला. ते दोघे प्रवेशद्वाराशी आले तर रस्त्याच्या कडेला बसलेला भिकारी हसू लागला. म्हणाला, ''क्षमा करा. फक्त यात एक त्रुटी आहे. एक धोका आहे. तो धोका महाग पडेल. तुम्ही आत जा आणि हा जो दरवाजा आहे तोही बंद करून टाका. म्हणजे पूर्ण सुरक्षित व्हाल.''

सम्राट म्हणाला,''पण मग मी आतच मेलो तर ती माझी कबरच होईल.''

भिकारी म्हणाला, ''कबर तर झालेलीच आहे. खाली एकच दरवाजा शिल्लक आहे.'' जेवढी सुरक्षा आपण करतो, तेवढी ती कबर होते. तुम्ही दगड बनला आहात. प्रेमाचा अर्थ आहे. दरवाजे मोकळे करा. **असुरक्षित होणे म्हणजे जिवंत असणे. जगण्याचे सूत्र आहे. असुरक्षितेत जगणे. दगड सुरक्षित आहेत. फुले जिवंत आहेत.** असे मार्मिक दृष्टान्त अधून–मधून येत राहतात. विवेचनाला ते रंजक बनवतात, तसेच अधिक अर्थपूर्णही बनवतात. अवघड विचारही त्यामुळे सहजपणे आपल्यापर्यंत पोचतो. अशा दृष्टान्तांचा खजिनाच ओशोंच्या प्रवचनांमधून भेटत राहतो.

कबीरांच्या भूमिकेतील वेगळेपणाचा प्रत्यय ओशोंच्या या प्रवचनांमधून होतो. त्यांतील साक्षात्कारी प्रतिभेची साक्ष पडते.

**पृष्ठे :१७८ ● किंमत : १२० रु. ● सभासदांना : ८४ रु. ● पोस्टेज : २० रु.**




*** महाराष्ट्र फाउंडेशनचे पुरस्कार**

महाराष्ट्र फाउंडेशनच्या समाजकार्य गौरव पुरस्कारासाठी यंदा पुण्याच्या 'समाज विज्ञान अकादमी' आणि 'मासूम' या सामाजिक संस्थांची निवड करण्यात आली. पुण्याचे डॉ. मोहन देशपांडे, नगरचे पोपटराव पवार, सामाजिक कार्यकर्त्या तिस्टा सेटलवाड, रमेश हरळकर, नागपूरचे विलास भोंगाडे आदींना समाजकार्य गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. उत्कृष्ट साहित्यासाठी दिल्या जाणाऱ्या पुरस्काराचा मान विख्यात कवी दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांना मिळाला.

रवींद्र नाट्यमंदिरात एक जानेवारीला हे पुरस्कार दिले गेले. पुरोगामी चळवळीचे पुरस्कर्ते आणि चित्रपट दिग्दर्शक गोविंद निहलानी हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते.

लेखक श्रीकांत देशमुख (कवितासंग्रह 'आषाढमाती'), श्याम मनोहर (कादंबरी 'खूप लोक आहेत'), सतीश आळेकर (नाटक 'पिढीजात'), शरद पाटील (वैचारिक ग्रंथ 'जात्यन्तक भांडवलदारी लोकशाही क्रांती आणि तिची समाजवादी पूर्ती'), हेमंत कर्णिक (अनुवाद 'दुष्काळ आवडे सर्वांना'), उर्मिला पवार (आत्मचरित्र 'आयदान') यांची उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. अनियतकालिकासाठीचा पुरस्कार बुलढाण्याच्या 'शब्दवेध'ला, तर रा. शं. दातार नाट्य पुरस्कार किरण पोत्रेकर यांच्या 'कळा या लागल्या जीवा' या नाटकाला देण्यात आला.

*** वृत्तपत्रांना समाजकारणाशिवाय पर्याय नाही : डॉ. टिकेकर**

वृत्तपत्रांना यापुढे समाजकारणाशिवाय पर्याय नाही. त्याचवेळी बदललेली आर्थिक गणितेही लक्षात घ्यावी लागतील, असे प्रतिपादन 'सकाळ'चे संपादक संचालक डॉ. अरुण टिकेकर यांनी सोलापूर येथे केले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या ६४व्या वाढदिवसानिमित्त शरद प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा शरद पुरस्कार डॉ. टिकेकर यांना मुंबई विद्यापीठाचे माजी इतिहास विभागप्रमुख, प्रा. जे. व्ही. नाईक यांच्या हस्ते देण्यात आला. डॉ. वीणा देव प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

वृत्तपत्रांमध्ये झालेले बदल व भविष्यातील या व्यवसायापुढील आव्हानांबाबत डॉ. टिकेकर यांनी विस्तृत विवेचन केले. आर्थिक स्थैर्य व विश्वासार्हतेवरच वृत्तपत्रे टिकतील, असे स्पष्ट करून ते म्हणाले, ''माझ्या पिढीच्या पत्रकारांनी वृत्तपत्रांतील सर्व बदल अनुभवले. यापुढे होणारे बदल फक्त छपाईतच होतील. वृत्तपत्रे छापणे दिवसेंदिवस अवघड होत चालले आहे. बदललेली गणिते लक्षात न घेतल्याने बरीच वृत्तपत्रे बंद पडली. भविष्यातही

बहुतांश वृत्तपत्रे बंद किंवा एकमेकांमध्ये विलीन होतील. त्यामुळे संपादकांनी भूमिका बदलली पाहिजे. वाचकांना काय हवे, जाहिरातदारांना काय हवे व संपादकांना काय हवे ते अंकात द्यावे लागणार.''

श्री. नाईक म्हणाले, ''टिकेकरांनी कधीही उदारमतवाद व बुद्धिप्रामाण्यवाद सोडला नाही. सर्वांगीण इतिहास त्यांनी सांगितला. इतिहास हा न्यायाधीशांच्या आसनावरून लिहावा; वकिलांच्या दृष्टिकोनातून नाही, हेही त्यांनी स्पष्ट केले. एशियाटिक सोसायटीला २०० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त इतिहासलेखनासाठी त्यांचीच निवड केली, ती यामुळेच.''

डॉ. टिकेकर यांच्या लेखनाचा धावता आढावा घेत डॉ. देव म्हणाल्या, ''टिकेकर गांभीर्याने पत्रकारितेकडे बघणारे आहेत. त्यांनी निर्भीड, नि:पक्ष, विचारांकडे झुकणारे, समाजमनाचा शोध घेणारे लेखन केले.''

### * शाहीर जंगम स्वामी यांना पठ्ठे बापूराव पुरस्कार

पुणे महापालिकेतर्फे लोकनाट्य व लोककलेच्या क्षेत्रासाठी दिला जाणारा पठ्ठे बापूराव पुरस्कार संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत योगदान दिलेले शाहीर जंगम स्वामी ऊर्फ नागसेन विभुते यांना देण्यात आला आहे. शाल, स्मृतिचिन्ह व २५ हजार रुपये, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

हे पुरस्कार देण्यास १९९५ पासून सुरुवात झाली. यापूर्वी श्रीमती यमुनाबाई वाईकर, डॉ. सरोजिनी बाबर, शहीर साबळे, ज्ञानोबा उत्पात गुरुजी, श्रीमती लक्ष्मीबाई कोल्हापूरकर, शाहीर बापूराव विभुते, चंद्रकांत ढवळपुरीकर, श्रीमती लीला गांधी, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे.

या पुरस्काराबरोबरच लोकनाट्य क्षेत्रातील वारूबाई वाईकर, शकुंतला लोणंदकर, गुलाब मास्तर, किशोर गरुड व मीरा उमप यांचाही पाच हजार रुपये व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

ज्येष्ठ अभिनेत्री लीला गांधी, किसन नखाते, केशवराव बडगे, अशोक जाधव, जयप्रकाश वाघमारे, शाहीर हेमंत मावळे हे निवड समितीचे सदस्य होते.

### * श. र. जोशी यांना हिंदी अकादमी पुरस्कार

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेचे सचिव श. र. जोशी यांना राज्य शासनाच्या महाराष्ट्र साहित्य हिंदी अकादमी (मुंबई) तर्फे पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पुरस्काराचे स्वरूप ५१ हजार रुपये व सन्मानपत्र असे आहे. जोशी हे गेली ५० वर्षे संस्थेच्या सेवेत आहेत.

### * डॉ. कल्याणी मांडके यांना 'जिंदादिल पुरस्कार'

रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा 'जिंदादिल पुरस्कार' यंदा ज्येष्ठ श्रवणशास्त्रज्ञ डॉ. कल्याणी मांडके यांना जाहीर झाला आहे. पाच हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे सवरूप आहे.

### * जल आंदोलन करणे आवश्यक - सुंदरलाल बहुगुणा

हिमालयातून मी मुंबईत आलो आहे ते समुद्राला हिमालयाची वेदना ऐकविण्यासाठी. २०२५ साली गंगोत्रीचा उगम संपेल, जंगल नष्ट होऊन पर्यावरणाला धोका पोहोचेल. हे टाळण्याकरिता जल आंदोलन करण्याची गरज आहे. असे मत ज्येष्ठ पर्यावरणवादी सुंदरलाल बहुगुणा यांनी व्यक्त केले.

साऊथ इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने देण्यात येणारे चंद्रशेखरेंद्र सरस्वती राष्ट्रीय गौरव पुरस्कार माटुंगा येथील षण्मुखानंद सभागृहात बहुगुणा, सी.एस.आय.आर.चे संचालक डॉ. रघुनाथ माशेलकर, प्रसिद्ध संगीततज्ञ टी. मुरुगदास यांना भारताचे इंग्लंडमधील उच्चायुक्त डॉ. एल. एम. सिंघवी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. नियोजन आयोगाचे माजी उपाध्यक्ष के. सी. पंत यांनाही हा पुरस्कार घोषित करण्यात आला होता. परंतु ते या कार्यक्रमास उपस्थित राहू शकले नाहीत. अडीच लाख रुपये, स्मृतिचिन्ह, मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

बहुगुणा म्हणाले की, पाणी ही देशाची प्रमुख समस्या आहे भारतावरील जलसंकट टाळण्याकरिता पाणी जपून वापरण्याची, उद्योग आणि शेतीला करायच्या पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्याची आणि वृक्षलागवड करण्याची त्रिसूत्री अमलात आणणे गरजेचे आहे.

सत्काराला उत्तर देताना डॉ. माशेलकर म्हणाले की, २१ वे शतक हे माहिती व तंत्रज्ञानाचे शतक असून भारताची श्रीमंती या शतकात साऱ्या जगाला दिपवून टाकेल. डॉ. सिंघवी म्हणाले की, परोपकार ही पुण्याची परिभाषा असून आजही समाजात अनेक दुर्योधन आहेत. या दुर्योधनांना धर्म व अधर्माची चांगली माहिती असूनही त्यांनी अधर्माची कास धरली आहे. त्यांच्यावर मात करण्याकरिता व भारताच्या संस्कृतीचे आणि, परंपरांचे जतन करण्याकरिता तत्त्वांचा सन्मान आणि मूल्यांचे रक्षण करणे गरजेचे आहे.

### * हरी नरके यांना फुले समता पुरस्कार

महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने देण्यात येणारा 'महात्मा फुले समता पुरस्कार' हरी नरके यांना प्रदान करण्यात आला.

महात्मा फुले समता परिषदेचे अध्यक्ष व सार्वजनिक बांधकाममंत्री छगन भुजबळ, राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत, 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, गृहराज्यमंत्री सिद्धराम म्हेत्रे, बाळासाहेब शिवरकर, कमल ढोले पाटील, तुकाराम बिरकड, रमेश बागवे, मोहन जोशी, अण्णा थोरात आदी या वेळी उपस्थित होते. एकवीस हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

महात्मा फुले यांचे विचार, कार्य आणि चळवळीचा प्रसार व प्रचार करणाऱ्या व्यक्तीला हा पुरस्कार दरवर्षी देण्यात येणार आहे. सरकारच्या 'महात्मा फुले चरित्र साधन प्रकाशन समिती'च्या सचिवपदी कार्यरत आहेत. व्याख्यानाद्वारे फुले यांचे विचार मांडण्याचे काम नरके यांनी केले आहे.

### * केंद्राच्या सामाजिक न्याय विभागातर्फे डॉ. वा. ना. तुंगार यांना पुरस्कार

मतिमंद व अपंग व्यक्तींच्या पुनर्वसनाच्या कार्याबद्दल ज्येष्ठ समाजसेवक डॉ. वा. ना. तुंगार यांना केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय विभागातर्फे 'राष्ट्रीय पुरस्कार' राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे देण्यात आला.

डॉ. तुंगार गेली वीस वर्षे अपंग लोकांना रोजगार मिळवून देण्याचे काम करत

आहेत. त्यांच्या अपंग उद्योग केंद्रात पुठ्ठ्याची खोकी बनविणे, औषधांचे पॅकिंग करणे व कालबाह्य औषधे नष्ट करणे आदी कामे अपंगांकडून केली जातात. डॉ. तुंगार यांनी राज्याच्या 'सर्व शिक्षण अभियाना'तून सुमारे एक हजार प्राथमिक शिक्षकांना अपंगांसाठीच्या कायद्याचे प्रशिक्षण दिले आहे. सध्या ते मुळशी येथे 'समाजाधारित अपंगांचे पुनर्वसन' या प्रकल्पातून अपंगांना शेतीचे प्रशिक्षण देत आहेत; तसेच 'यशदा'तर्फे अनेक सामाजिक उपक्रम राबवीत आहेत.

'संधी पाहिजे; पण दया नको,' या ब्रीदवाक्यातून अपंगांमध्ये व्यावहारिक दृष्टिकोन निर्माण करणे, हा त्यांचा प्रयत्न आहे. अपंगांसाठी स्वतंत्र उद्योगसमूह स्थापन करण्याची त्यांची योजना आहे.

### * प्रभाताई शिवणेकर यांना लक्ष्मीबाई कोल्हापूरकर पुरसकार

तमाशा कलावंत प्रभाताई शिवणेकर यांना 'लक्ष्मीबाई कोल्हापूरकर पुरस्कार' ज्येष्ठ अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

लक्ष्मीबाई कोल्हापूरकर कला प्रतिष्ठानतर्फे सहा लोककलावंतांचा सत्कार करण्यात आला. प्रतिष्ठानच्या अध्यक्षा मधू कांबीकर, कार्याध्यक्ष मधुकर नेराळे, सचिव दादा पासलकर, कुरुळीचे उपसरपंच एम. के. सोनवणे या वेळी उपस्थित होते. शिवणेकर यांना स्मृतिचिन्ह व अकरा हजार रुपये रोख, असा पुरस्कार देण्यात आला. ज्येष्ठ शाहीर यशवंत भिसे, तमाशात अनेक वर्षे सोंगाड्याचे काम केलेले विष्णुपंत लागवे, गोंधळी लक्ष्मण घोटकर व छबूताई शिरवळकर या बुजुर्ग कलावंतांबरोबरच माया खुटेगावकर यांचाही एक हजार रुपये देऊन सत्कार करण्यात आला.

''अवघड परिस्थितीतही ज्यांनी कला जिवंत ठेवली, त्यांच्याकडून नव्या, प्रतिभावान कलाकारांनी स्फूर्ती घ्यावी,'' असा सल्ला श्री. कोल्हटकर यांनी दिला. नवोदित नृत्यांगनांनी अभ्यास करून कला सादर करावी, या लक्ष्मीबाईंच्या सूचनेची आठवण मधू कांबीकर यांनी करून दिली.

### * दमाणी पुरस्कारांचे वितरण

रचनात्मक समाजाचे चिंतन करणाऱ्या, साहित्याचे 'डोस' देणाऱ्यांनी आज पुन्हा एकदा स्वत:ला हलवून घेण्याची गरज आहे, असे प्रतिपादन आंध्र प्रदेशाचे राज्यपाल सुशीलकुमार शिंदे यांनी सोलापूर येथे केले. साहित्यिकांनी भविष्याचा विचार करून लिखाण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

ज्येष्ठ समीक्षक डॉ. गो. मा. पवार यांना 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जीवन व कार्य' या चरित्रग्रंथासाठी, लेखक प्रा. विश्राम गुप्ते यांना 'अल त्मीर' कादंबरीसाठी, तसेच कवी फ. मुं. शिंदे यांना 'पाठभेद' काव्यसंग्रहासाठी पुरस्कार प्रदान करण्यात आले.

प्रा. केशव मेश्राम अध्यक्षस्थानी होते. उद्योजक प्रेमरतन दमाणी, नवरतन दमाणी, निमंत्रक रामदास फुटाणे व्यासपीठावर उपस्थित होते. स्मृतिचिन्ह, १५ हजार रुपये रोख, शाल, श्रीफल असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

आजचे पुरस्कारप्राप्त तीनही लेखक आधुनिकतेचे 'माइल स्टोन' आहेत, असे नमूद करून, श्री. शिंदे म्हणाले, ''एकविसाव्या शतकात जात असताना आपण काय पुढे नेत आहोत, याचा विचार करायला हवा. पुरस्कारप्राप्त लेखकांचे लिखाण हृदयाला व मेंदूला हलवणारे आहे. त्यांची निवड आधुनिक परिवर्तनाची दिशादर्शक आहे. लेखक द्रष्टा असतो. त्याला भविष्य दिसते.''

श्री. मेश्राम म्हणाले, ''समाजाच्या पुनर्जीवनाचे काम महर्षींनी केले. धर्माकडे त्यांनी एका वेगळ्या नजरेतून पाहिले. धर्म माणसाच्या जीवनात सुवास, सुगंध निर्माण करतो. ही महर्षींच्या विचारांची मांडणी श्री. पवार यांनी योग्य पद्धतीने केली आहे.''

प्रेमरतन दमाणी यांनी प्रास्ताविक केले. ज्येष्ठ पत्रकार विवेक घळसासी यांनी सूत्रसंचालन केले.

### * 'मराठी प्रकाशकांनी पुस्तकविक्रीसाठी नव्या तंत्रज्ञानाला सामोरे जावे'

'केवळ छापखान्यातून कम्प्युटरवर पोचणे, म्हणजेच आधुनिक बनणे नव्हे. तर वाढीव प्रमाणात पुस्तकविक्री साध्य करण्यासाठी इंटरनेट, वाहिन्यांवरील जाहिराती आदी नव्या माध्यमांशी हातमिळवणी करणे आज अत्यावश्यक आहे, याचे भान मराठी प्रकाशकांनी ठेवणे गरजेचे आहे' असे प्रतिपादन अल्फा मराठी वाहिनीचे प्रमुख कार्यकारी अधिकारी नीतिन वैद्य यांनी केले. मात्र दुर्दैवाने भूतकाळातच रममाण होण्यात मश्गुल झालेले मराठी प्रकाशक या नव्या माध्यमांकडे पाठ फिरवून आहेत, असा आरोपही त्यांनी केला.

शताब्दी पार केलेल्या ढवळे प्रकाशन संस्थेने आपल्या वार्षिक पारितोषिक वितरण सोहळ्यानिमित्त आयोजिलेल्या 'ग्रंथव्यवहारास प्रसारमाध्यमे कितपत पोषक?' या विषयावरील परिसंवादात नीतिन वैद्य बोलत होते. 'वाहिन्यांवरील सारेच उठवळ' ठरवून त्यांच्यावर सारेच झोड उठवताना दिसतात. पण वास्तविक दोन ऑक्टोबर १९७२ रोजी मुंबईत दूरदर्शन केंद्र सुरू झाल्यावर त्यावर 'प्रतिमा आणि प्रतिभा','शरदाचे चांदणे', 'हसरा गजरा'सारखे कैक दर्जेदार कार्यक्रम सादर झाले होते. १९९९ साली अल्फा मराठी सुरू झाल्यावर आम्हीही मराठी ग्रंथव्यवहाराला उत्तेजन देण्यासाठी 'पिंपळपान', पुलंच्या 'व्यक्ती आणि वल्ली'चे नाट्यावलोकन,'हाऊसफुल्ल', 'नक्षत्रांचे देणे' असे कित्येक वाङ्मयीन कार्यक्रम प्रारंभी पदराला खार लावून सुरू केले. 'नक्षत्रांचे देणे'चे २३ पैकी १६ कार्यक्रम आमच्यासाठी आतबट्ट्याचाच व्यवहार होता; पण तरी सांस्कृतिक दायित्व म्हणून तो तोटा अल्फाने सोसला. पण आमच्या या प्रयत्नांना प्रकाशकांकडून मात्र अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. वृत्तपत्रांच्या दरापेक्षा सवलतीच्या दरात रविवारी सकाळी नव्या पुस्तकांच्या जाहिराती प्रदर्शित करण्याची तयारी दर्शवणारी पत्रे मी स्वत: ६९ प्रकाशकांना पाठवली; त्यातील केवळ चौघांनी प्रतिसाद दिला' असे वैद्य यांनी सांगितले.

आकाशवाणी उपमहानिरीक्षक जयंत एरंडे यांनीही अनेक साहित्यिक उपक्रम राबवणाऱ्या आकाशवाणीला प्रकाशकांकडून असाच थंडा प्रतिसाद लाभत असल्याचा आरोप केला. प्रकाशकांतर्फे बोलणाऱ्या 'ग्रंथाली'चे दिनकर गांगल यांनी, त्या दोघांच्या मुद्द्यांशी सहमती दर्शवली; परंतु छोटे मालक असलेल्या प्रकाशकांच्या व्यावहारिक अडचणी यावेळी स्पष्ट केल्या. सर्व माध्यमांच्या प्रमुखांनी प्रकाशकांशी एकत्रितपणे चर्चा करून या अडचणींतून तारतम्याने मार्ग काढावा, असे त्यांनी सुचवले. नीला उपाध्ये यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

पत्रकार आल्हाद गोडबोले यांच्या हस्ते २००३चे ढवळे पुरस्कार देण्यात आले.

सर्वोत्कृष्ट आध्यात्मिक पुस्तकासाठीचा केशव भिकाजी ढवळे पुरस्कार 'योगशास्त्र'या पुस्तकासाठी 'मॅजेस्टिक प्रकाशना'चे अशोक कोठावळे यांनी स्वीकारला. मुद्रणसौंदर्यासाठीचा बाळकृष्ण गणेश ढवळे पुरस्कार पुण्याच्या 'करोला पब्लिकेशन्स'चे श्रीकांत इंगळहळीकर यांना 'आसमंत'या पुस्तकासाठी मिळाला तर सर्वोत्कृष्ट बालसाहित्यासाठीचा धनंजय बाळकृष्ण ढवळे पुरस्कार 'मनोविकास प्रकाशना'चे अरविंद पाटकर यांनी 'आमची शाळा'पुस्तकासाठी स्वीकारला. प्रत्येकी तीन हजार रुपयांचे हे पुरस्कार आहेत.

यावेळी महामहोपाध्याय स. कृ. फडके लिखित 'अकरा हनुमंतांशी हितगुज'या ५० वर्षांपूर्वीच्या दुर्मिळ ग्रंथाच्या नव्या आवृत्तीचे प्रकाशनही करण्यात आले. दिवंगत फडके यांच्या वयोवृद्ध पुतणी नीलाताई जोशी यांनी पुस्तकप्रकाशनाबद्दल फडके कुटुंबियांतर्फे ढवळे प्रकाशनाचे आभार मानले. संचालिका ज्योती ढवळे यांनी सवागत केले. अरुणा जोगळेकर यांनी सूत्रसंचालन केले.

### * डॉ. रवींद्र ठाकूर यांच्या 'महात्मा' कादंबरीस जनसारस्वत पुरस्कार प्रदान

अमरावती येथील जनसारस्वत वाचनालयातर्फे दिला जाणारा जनसारस्वत पुरस्कार यावर्षी डॉ. रवींद्र ठाकूर यांच्या 'महात्मा' या कादंबरीस अमरावती येथे पार पडलेल्या जनसाहित्य संमेलनात प्रदान करण्यात आला. गेल्या दहा वर्षातील उत्कृष्ट कादंबरी म्हणून 'महात्मा' ची निवड झालेल्या या कादंबरीत डॉ. ठाकूर यांनी म. फुले यांच्या जीवनकार्याचा आणि विचारप्रणालीचा प्रभावी परिचय घडवला आहे. या कादंबरीचे भारतीय भाषांमध्ये अनुवाद होत आहेत. इंग्रजी अनुवाद लवकरच ग्रंथरूपाने प्रसिद्ध होत आहे.

### * साहित्य अकादमी पुरस्कार

प्रसिद्ध कादंबरीकार सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास' या कादंबरीला साहित्य अकादमीतर्फे पुरस्कार जाहीर करण्यात आला. कोकणी भाषेसाठी जयंती नाईक यांच्या 'अथांग' या लघुकथा संग्रहाची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. या पुरस्कारांसाठी यंदा देशभरातून २२ साहित्यिकांची निवड करण्यात आली असून, त्यामध्ये इंग्रजी लेखक उपमन्यू चॅटर्जी, मल्याळम लघुकथाकार पॉल झचारिया यांचा समावेश आहे. फेब्रुवारीमध्ये दिल्ली येथे हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील. पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

यंदाच्या यादीत २२ भाषांमधील विजेत्यांमध्ये सात कवी आहेत. त्यामध्ये हिरेंद्रनाथ दत्त (आसामी), गुलाम नबी फकिर (काश्मिरी), चंद्रबानूसिंह (मैथिली), बिरेंद्रजित नाओरेम (मणिपुरी) आणि तमीळबन (तमीळ) यांचा समावेश आहे. उपमन्यू चॅटर्जी यांना 'मॅमरिज ऑफ वेल्फेअर स्टेट' या कादंबरीसाठी पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांच्याखेरीज गीता नागभूषण (कन्नड), नंद भारद्वाज (राजस्थानी), नवीन (तेलगू) यांना पुरस्कार देण्यात आला आहे.

पॉल झचारिया यांना त्यांच्या 'झचारियायुते कथाकल' या लघुकथा संग्रहासाठी पुरस्कार देण्यात आला आहे, तर हिंदी कवी वीरेन डंगवाल यांची 'दुष्टचक्र मे स्रिस्ता' या काव्यसंग्रहासाठी निवड झाली आहे.

याखेरीज यंदाच्या पुरस्कार विजेत्यांमध्ये सुतिंदरसिंग (पंजाबी), अमृतलाल विगद (गुजराती), सुधीर चक्रवर्ती (बंगाली), शिवनाथ (डोगरी), जोस योंजन (नेपाळी), प्रफुल्लकुमार मोहंती (उडिया), कलानाथ शास्त्री (संस्कृत), सतीश रोहरा (सिंधी) व सलाम बिन रज्जाक (उर्दू) यांचाही समावेश आहे.

### या काळ्या मातीनेच मला लेखक बनवले

''शेतकरी कुटुंबात जन्माला आलो. मातीत राबलो. म्हणूनच मातीतल्या माणसांची सुखदुःखे मांडू शकतो. या काळ्या मातीनेच मला लेखक बनवले आणि आता गौरवलेही,'' या शब्दांत सदानंद देशमुख यांनी आपला आनंद व्यक्त केला.

''या मातीनेच मला मोठे केले. खूप आनंद झाला. कोणतीही पूर्वकल्पना नसताना हे पारितोषिक मिळाल्याने त्या अचानकपणाचाही वेगळा आनंद मिळाला.''

'लचांड', 'उठावण', 'महालूट', यासारखे कथासंग्रह; 'तहान', 'बारोमास' आदी कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. ते बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्या जानेफल येथील महाविद्यालयात अध्यापक आहेत. मराठीमध्ये एम. ए. केल्यानंतर त्यांनी सुमारे १९७८ च्या सुमारास लेखनास प्रारंभ केला. यापूर्वी त्यांना जयवंत दळवी स्मृती पुरस्कार, पद्मश्री विठ्ठलराव विखे-पाटील साहित्य पुरस्कार आदी पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

### * अस्सल ग्रामीण साहित्यनिर्मिती शहरीकरणामध्येही शक्य

झपाट्याने होत असलेल्या शहरीकरणामध्ये नांगरांची जागा ट्रॅक्टरने घेतली असली, तरी अस्सल ग्रामीण साहित्यनिर्मितीची प्रक्रिया अजूनही थांबलेली नाही. शहरात नशीब चमकेना, आणि शेतात मन रमेना अशा कात्रीत सापडलेल्या नीवन पिढीची व्यथा मांडण्यास आधुनिक ग्रामीण साहित्यामध्ये वाव आहे, असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव यांनी व्यक्त केले.

मराठी साहित्यामधील प्रदीर्घ योगदानाबद्दल डॉ. यादव यांना यंदाचा लाभसेटवार पुरस्कार जाहीर झाला आहे. एक लाख रुपये आणि मानचिन्ह असे त्याचे स्वरूप असून आठ जानेवारी रोजी मुंबईत दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहामध्ये शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते तो प्रदान करण्यात येईल. अमेरिकेतील लाभसेटवार ट्रस्ट आणि लाभसेटवार फाउंडेशनच्या वतीने हा पुरस्कार देण्यात येतो. यापूर्वी श्री. ना. पेंडसे, विं.दा.करंदीकर,गंगाधर गाडगीळ, भालचंद्र नेमाडे यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. आतापर्यंत मिळालेल्या राज्य-राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कारांमध्ये लाभसेटवार पुरस्कार म्हणजे शिरपेच आहे, अशा भावना व्यक्त करून डॉ. यादव म्हणाले की, कष्टकरी शेतकऱ्याच्या कुटुंबामध्ये जन्म झाल्याने पंधरा-वीस वर्षांपर्यंतच्या आयुष्यात शेताचाच आसरा होता. त्यामुळेच अस्सल ग्रामीण जीवन नसानसात भिनले. आपोआपच साहित्यनिर्मिती झाली ती अस्सल ग्रामीण भाषेतूनच. शहरांमध्ये बसून केवळ कविकल्पना रंगवित केलेल्या साहित्यनिर्मितीमध्ये खरेपणा नव्हता, हे माझ्या लक्षात येत असे. त्यामुळेच अशा 'ग्रामीण' साहित्यिकांवर टीका केली. वाचकांपुढे ग्रामीण साहित्याबाबतचे अवास्तव चित्र आकाराला येऊ नये, यासाठी ही टीका केली. वाढत्या शहरीकरणामध्ये ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलला आहे. नांगराच्या जागी ट्रॅक्टर आले आहेत. परंतु, तरीही अस्सल ग्रामीण भाषेतून साहित्यनिर्मिती करण्यास वाव आहे. अस्सल म्हणजे खरेखुरे, वास्तवाला जाऊन भिडणारे साहित्य. त्यामुळेच गाव बदललेले गाव नेमके काय आहे, याचे चित्रण करणे म्हणजे अस्सल ग्रामीण साहित्य. त्याला अनुभव आणि संस्कृतीची मिळणारी जोड आजही कायम आहे.

❐




*** 'दक्षता'चे माजी संपादक व. कृ. जोशी यांचे निधन**

लोकप्रिय पोलीस चातुर्य कथाकार व 'दक्षता'या नियतकालिकाचे पहिले संपादक, निवृत्त पोलीस अधिकारी वसंत कृष्णाजी तथा व. कृ. जोशी (वय ८६) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

पोलीस खात्यामधील चाळीसहून अधिक वर्षांच्या सेवेत 'वकृं'नी विविध पदांवर काम केले. कोलकत्यामधील केंद्रीय गुप्तहेर प्रशिक्षण प्रशालेच्या उपप्राचार्यपदाची जबाबदारी त्यांनी सांभाळली. साक्षीदाराने केलेल्या वर्णनावरून संशयित आरोपीचे रेखाचित्र काढण्याचे शास्त्र त्यांच्या प्रयत्नांमुळे विकसित झाले. पोलीस व गुप्तहेर खात्यातील अनुभवाच्या 'खजिन्या'ला न्यायवैद्यकशास्त्राची जोड देत त्यांनी अनेक पोलीस चातुर्यकथा रंगविल्या. 'इन्स्पेक्टर प्रधान' ही त्यांची काल्पनिक व्यक्तिरेखा खूपच गाजली.

अहमदनगर व पुण्यात शालेय शिक्षण झाल्यानंतर 'वकृं'नी मुंबई विद्यापीठातून विज्ञान पदवी प्राप्त केली. १९४०च्या सुमारास ते पोलीस दलात रुजू झाले. त्या वेळी मुंबई प्रांतामध्ये गुजरात व कर्नाटक यांचा समावेश असल्यामुळे या भागांतही त्यांनी काम केले. पोलीस सेवेत असताना त्यांनी कायद्याचीही पदवी घेतली. पुढे कोलकत्यामधील केंद्रीय गुप्तहेर प्रशिक्षण प्रशालेमध्ये प्राध्यापकपदाचे काम स्वीकारले. या प्रशालेच्या उपप्राचार्यपदापर्यंत त्यांना बढती देण्यात आली. या प्रशालेमध्ये केरळपासून काश्मीरपर्यंतचे पोलीस अधिकारी प्रशिक्षणासाठी येत. त्यांच्याशी संवाद साधून 'वकृं'नी पोलीस व गुन्हेविषयक घटना, तपासकामांची माहिती घेतली. त्यावर आधारित एक कथासंग्रहाचे त्यांनी कोलकत्यामध्ये प्रकाशन केले. राज्य शासन व जनता यांच्यामध्ये सहकार्याचा दुवा म्हणून 'दक्षता' या नियतकालिकाची निर्मिती करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला. त्यांच्या संपादकपदाची जबाबदारी 'वकृं'वर सोपविण्यात आली. त्यांनी पोलीस कल्याण निधीमधून ४० हजार रुपयांचे कर्ज काढून 'दक्षता'सुरू केले. अवघ्या सहा महिन्यांमध्ये हे कर्ज फेडले! पोलीस खात्यामध्ये केलेल्या कामगिरीसाठी त्यांना राष्ट्रपती पदक प्रदान करण्यात आले होते.



साहित्य क्षेत्रातही 'वकृं'नी ठसा उमटविला. सत्यघटनांवर आधारित पोलीस चातुर्य कथा त्यांनी लिहिल्या. 'दक्षता'च्या संपादकपदाच्या जबाबदारीसह २७ कथासंग्रह, दोन नभोवाणी नाट्ये व दूरचित्रवाणी वरील दोन मालिकांसाठी त्यांनी लेखन केले. पोलिसी कथांना ओंगळवाणे स्वरूप न देता त्यामधील थरार त्यांनी कायम ठेवला. त्याचप्रमाणे पोलीस तपासाबाबतही कथांच्या माध्यमातून शास्त्रीय माहिती दिली. अभूतपूर्व हत्या, पोलीस चातुर्यकथा, गुन्ह्याचा तपास आणि विज्ञान, निवडक पोलीस कथा, पोलीस विज्ञानकथा, गुन्हेगारीची नवी रूपे, डिटेक्टिव्ह राजूच्या करामती आदी त्यांचे कथासंग्रह गाजले. सातारा येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये 'वकृं'चा 'वेगळ्या वाटेने जाणारा साहित्यिक'म्हणून गौरव करण्यात आला. शिक्षणक्षेत्रातही 'वकृं'नी काम केले. ज्ञानेश्वर विद्यापीठाचे ते १९८८ पासून विश्वस्त होते.

*** आर्थर हेली : एक अफलातून लेखक**

आर्थर हेली यांचे २७ नोव्हेंबर रोजी निधन झाले. आर्थर हेली यांच्या लेखनाचा आवाका खरोखरच प्रचंड होता.

'इन हाय प्लेसेस'या कादंबरीत हेन्री दुवल नावाचा एक सामान्य माणूस बोटीने फुकट प्रवास करत कॅनडाला पोचतो. पण मग राजकारणात त्याचा कसा उपयोग करून घेतला जातो, याचे वर्णन आहे. पूर्ण कांदबरी काल्पनिक असली, तरी अत्यंत तर्कशुद्ध आहे. तसे घडू शकेल याची खात्री पटते.

त्यांच्याच स्ट्राँग मेडिसिन, इव्हनिंग न्यूज, ओव्हरलोड, हॉटेल, मनीचेंजर या कादंबऱ्या बेस्टसेलर ठरल्या. त्याही अत्यंत सूक्ष्म निरीक्षण दाखविणाऱ्या आहेत. अशी माणसे प्रत्यक्षात असतील, असे वाटण्याइतपत व्यक्तिरेखा उत्तम आहेत.

विविध क्षेत्रांमधील माहिती जाणून घेण्याचा हेलीचा आवाका प्रचंड होता. प्रत्येक कादंबरीतली तांत्रिक माहितीही अचूक. प्रत्येक कादंबरी संशोधन करून लिहिली आहे, हे जाणवते. इतक्या विविध विषयांवरील उत्तम कादंबऱ्या लिहिणारा दुसरा लेखक क्वचितच आढळेल.

*** ग्रंथपाल शां. शं. रेगे**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी आणि पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष शांताराम शंकर तथा शां. शं. रेगे यांचे शुक्रवार, १० डिसेंबर रोजी पहाटे 'रेगे हाऊस' या त्यांच्या निवासस्थानी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९० वर्षांचे होते.

आंबेडकरी चळवळीशी सुरुवातीपासूनच संबंध असलेले रेगे सिद्धार्थ महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच डॉ. आंबेडकर यांच्या समवेत होते. डॉ. आंबेडकर यांनी त्यांना ग्रंथपाल म्हणून नियुक्त केले होते. या पदावर असताना त्यांनी सिद्धार्थ महाविद्यालयाच्या ग्रंथालयात अनेक दुर्मिळ पुस्तकांचा संग्रह केला होता. ग्रंथालय चळवळीत त्यांचा सहभाग होता.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय आणि इतर अनेक ग्रंथालयांशी त्यांचा निकटचा संबंध होता.

आंबेडकरी चळवळीतील त्यांच्या योगदानाबद्दल २००१ साली अंधेरी येथील कर्मवीर दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्राने 'कर्मवीर' हा पुरस्कार दिला होता.

*** निरंजन उजगरे**

अन्य भाषांतील कविता मराठीत आणून मराठी कवितेचे दालन समृद्ध करणारे कवी निरंजन उजगरे (वय ५५) यांचे १२ डिसेंबर रोजी ठाणे येथील रुग्णालयात निधन झाले. ते श्वसनमार्गाच्या संसर्गाने आजारी होते.

व्यवसायाने मेकॅनिकल इंजिनिअर असलेल्या उजगरे यांनी 'कवितांच्या गावा जावे' या कार्यक्रमाच्या निमित्ताने अशोक नायगावकर, अशोक बागवे, अरुण म्हात्रे, नीलेश पाटील, किशोर कदम (सौमित्र) यांच्यासोबत महाराष्ट्रभर भ्रमंती केली. 'मर्ढेकरांपासून आजपर्यंत' व 'दिनार ते दीपवा' हे दोन कार्यक्रम उजगरे यांनी पत्नी अनुपमा यांच्यासोबत महाराष्ट्रभर केले. विविध भारतीय भाषांतील उत्कृष्ट कवितांचा अनुवाद त्यांनी मराठीतून केला. त्यातून 'काव्यपर्व' हा कवितासंग्रह साकारला. 'नवे घर', 'दिनार', 'परिच्छेद', 'प्रहर', 'दीपवा', आदी त्यांचे कवितासंग्रहही प्रसिद्ध होते. 'स्वरंग'ही प्रकाशन संस्था त्यांनी केवळ नवोदित कवि-कवयित्रींसाठी स्थापन केली. 'जायंट व्हील' ही त्यांची कादंबरी गाजली. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले होते.

*** लक्ष्मीकांत बेर्डे**

विलक्षण बोलका चेहरा, विनोदाचे अफलातून 'टायमिंग' आणि शाब्दिक कोट्यांद्वारे गेली दोन दशके प्रेक्षकांना मनमुराद हसविणारे प्रसिद्ध अभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे (वय ५०) यांचे १६ डिसेंबर रोजी मूत्रपिंडाच्या विकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी प्रिया बेर्डे, मुलगा अभिनय, मुलगी स्वानंदी असा परिवार आहे.

अभिनयाच्या क्षेत्रात १९७२ मध्ये पदार्पण केलेल्या बेर्डे यांना १९८३ मध्ये यशाची पहिली चव चाखायला मिळाली. तीन दशकांच्या कारकिर्दीत त्यांनी २५० मराठी व शंभर हिंदी चित्रपट, तसेच १२ नाटके याद्वारे रसिकांचे मनोरंजन केले. 'धूमधडाका', 'दे दणादण', 'थरथराट', 'धडाकेबाज', 'अशी ही बनवाबनवी', 'एक होता विदूषक', 'मैने प्यार किया', 'हम आपके है कौन' आदी चित्रपट तसेच 'टुरटुर', 'कार्टी प्रेमात पडली', 'बिघडले स्वर्गाचे दार', 'शांतेचं कार्ट चालू आहे' आदी नाटकांमधील त्यांच्या भूमिका विशेष गाजल्या. सहज वावर, मोकळा अभिनय, आवाजातील बदल यांचा वापर करीत त्यांनी स्वत:ची शैली जपली आणि स्वत:चा प्रेक्षकवर्ग निर्माण केला. प्रकृतीतील चढ-उतारांमुळे गेले दोन-तीन महिने त्यांना चित्रीकरणातही भाग घेता आला नव्हता. महेश कोठारे यांचे दिग्दर्शन असलेला 'पछाडलेला' हा त्यांचा प्रदर्शित झालेला शेवटचा चित्रपट. ❐



## वाचकांचा प्रतिसाद

**दिवाळी अंक**

मेहता मराठी ग्रंथजगत दीपावली विशेषांक आवडला. अनोख्या उत्कट नात्याचे बंध उलगडणारे लेखन व त्यातील महादेव मोरे, रा. अ. कुंभोजकर, सुनीता दांडेकर यांचे लेख विशेष भावले. सुनीता दांडेकरांचा लेख अगदी निरागस, अत्यंत मुलायम भाषेतील असून माणसातला माणूस ओळखण्याचा प्रांजळ प्रयत्न स्पष्ट दाखविणारा आहे. मोरेंची कथाही छान जमलेली आहे.

अतींद्रिय अनुभवाबद्दल कथन करणारे शरद महाबळ, नीलिमा आंगले, रजनी अपसिंगेकर, सुनंदा देशमुख, ना. द. जोशी इत्यादींचे लेखन भावस्पर्शी झालेले आहे. तसे पाहिले तर अंत:करणात असणारी परमेश्वराची निस्सीम श्रद्धा हाच अतींद्रियाचा मुख्य भाग आहे. तो चराचरातच असतो. मानला तर देव... नाहीतर दगड! हा आकाशाला भिडणारा विषय असल्यामुळे इनट्युशन, टेलीपथी, क्लेअरव्हॉयन्स, स्वप्नसंकेत, भूत सृष्टी इत्यादींचा उलगडा करण्यासाठी वेगवेगळे प्रकल्प प्राचीन काळापासून राबवले जात आहेत.

ज्यूल्स व्हर्नने १८६३ साली चंद्रावर स्वारी ही कादंबरी लिहिली. १९६९ साली आर्मस्ट्राँगने चंद्रावर पहिले पाऊल ठेवले. असे संपादकीयात लिहिले आहे. ते मार्मिक आहे. अतींद्रिय व गूढ विद्येवरची कैक पुस्तके बाजारात उपलब्ध असतात. परंतु त्याचा ठराविक वाचकवर्ग असतो. नाथसंप्रदायात ही विद्या जास्त प्रमाणात अमलात होती. सामान्य माणूस हा स्वत:च्या जीवाला जपणारा असतो. आपल्या कुटुंबाचे भले व्हावे, आपल्याला ऐश्वर्य मिळावे हे करत असताना त्याच्या मनात अनामिक भीती असते. आणि हे करत असताना वेळप्रसंगी न आठवणाऱ्या देवाचा व साधुसंतांचा धावा करावा लागतो. गटुळं ही आत्मवृत्तात्मक कादंबरी मी १९ वर्षापूर्वी लिहिली व तीन वर्षापूर्वी छापली गेली. योगायोगाचा भाग म्हणजे कादंबरी प्रकाशित झाल्यावर साईंच्या चरणी ठेवून पुरस्कारप्राप्त ठरावी अशी याचना केली होती. तिला नऊ पुरस्कार मिळाले अर्थात मी नाममात्रच लेखक आहे. प्रयत्नाबरोबर श्रद्धा आणि सबुरी हवीच! प्रयत्न करूनही घडणारं घडत नसतं, घडवणारा हा प्रयत्न न करणाऱ्यांनाही कधी कधी संधी देत असतो. अशी कैक उदाहरणे सापडतील.

मेहता पब्लिशिंग हाऊसला हार्दिक शुभेच्छा.

रवींद्र बागडे, मुंबई ४०० ०९२.

# वाचनालयांना आवाहन

आज वेगवेगळ्या प्रकारची माहिती मिळवण्याचे विविधमार्ग उपलब्ध झालेले आहेत. इंटरनेटच्या प्रसाराने हवी ती माहिती तयार मिळण्याचा 'रेडिमेड' मार्गही खुला आहे. त्यामुळे माहिती म्हणजेच ज्ञान व हे ज्ञान हवे तेव्हा मिळवता येते असा गैरसमज सर्वत्र प्रत्ययास येतो.

परंतु मानवी जीवन, मन, प्रगल्भ, आनंदी व विचारी होण्यासाठी वाचनाला आजही कोणताही पर्याय नाही. वाचनाने मानवी मनाची, बुद्धीची मशागत होते व व्यक्ती अधिक सृजनशील, क्रियाशील बनते. वाचनाचा सार्वत्रिक प्रसार झाला तर सारा समाजच प्रगत बनेल.


यासाठी आज वाचनसंस्कृतीची वाढ करण्याची नितांत आवश्यकता आहे. या कार्यात वाचनालयांनी फार मोठे योगदान देण्याची गरज आहे. वाचन संस्कृतीची वाढ होण्यासाठी वाचनालयातून उत्तम दर्जेदार पुस्तके वाचकांना उपलब्ध झाली पाहिजेत- अशी पुस्तके कित्येक वाचनलयांतून आज उपलब्ध होत नाहीत.

जादा कमिशन मिळते म्हणून दर्जाहीन, पुस्तके वाचनालयांकडून खरेदी केली जातात आणि अशी पुस्तकेच गावोगावीच्या वाचकांना दिली जातात.

मनोरंजनाच्या भुलभुलैय्यात अडकलेल्या आजच्या युवापिढीला योग्य मार्गदर्शन करणाऱ्या व मनाला प्रगल्भ बनवणाऱ्या पुस्तकांचा प्रसार अधिकाधिक होणे गरजेचे आहे. यासाठीच सर्व वाचनालयांना आम्ही आवाहन करीत आहोत, फक्त उत्तमच पुस्तके घ्या आणि समाजाच्या बौद्धिक विकासाचे पाईक बना, काही ज्येष्ठ नामवंतांनी नावजलेल्या दर्जेदार पुस्तकांची माहिती आम्ही सादर करीत आहोत. प्रत्येक वाचनालयात ही पुस्तके असलीच पाहिजेत, असे आम्हाला वाटते. वाचनालयांनी ही पुस्तके घ्यावीत व आपले वाचनालय समृद्ध करावे ही अपेक्षा.



## नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके




**चंदूकाका** (बाल-किशोर वाङ्मय)

मुलांना आपल्या आसपासच्या परिसरातील प्राणीविश्वाची ओळख करून देणारे 'पर्यावरण' या विषयावरील एक आदर्श पुस्तक


लेखक : **निलीमकुमार खैरे**

ज्योत्स्ना प्रकाशन, पुणे.

**किंमत : ५० रुपये**

**कलर पेन्सिल** (चित्रकला)


'रंगीत पेन्सिल' काहीशा दुर्लक्षित रंगमाध्यमाची निसर्गदृश्य, व्यक्तिचित्रण, प्राणी व पक्ष्यांची चित्रे, स्टिल लाईफ यांचे तंत्र प्रात्यक्षिकांच्या साह्याने सविस्तर उलगडून दाखवणारे पुस्तक




लेखक : **राहुल देशपांडे / गोपाळ नांदुरकर**

**किंमत : ९० रुपये**

ज्योत्स्ना प्रकाशन, पुणे.




**साहसी मुले** (बाल-किशोर वाङ्मय)


किशोरवयीन मुलांच्या अचाट साहसाच्या आणि विलक्षण धैर्याच्या सहा रोचक कथा.

लेखक : **सुरेखा पाणंदीकर**

ज्योत्स्ना प्रकाशन, पुणे.

**किंमत : २५ रुपये**

**पोस्ट खर्च वेगळा पाठवावा.**




## यांनी घडवलं सहस्रक


विज्ञान-संशोधन,राजकारण, समाजकारण, प्रवास-भ्रमंती, कलाक्षेत्र, तत्त्वज्ञान-चिंतन, साहित्य-वाङ्मय, उद्योग-व्यवसाय, क्रीडाक्षेत्रात क्षेत्र यांत आपल्या कार्यकर्तृत्वाने विचारांनी व विचारांनी भर टाकणारी **१००० उत्तुंग व्यक्तिमत्त्वे**

संपादन : **सुहास कुलकर्णी/ मिलिंद चंपानेरकर**

रोहन प्रकाशन, पुणे.

**किंमत : ६९५ रुपये**

## बोल अनुभवाचे





माजी केंद्रीय मंत्री आणि वनराईचे अध्यक्ष मोहन धारिया यांच्या समाजकार्यातील व राजकीय जीवनातील काही उद्‌बोधक अनुभव आणि काही कार्याला प्रवृत्त करणारे प्रबोधने.

लेखक : **मोहन धारिया**

**किंमत : १५० रुपये**

रोहन प्रकाशन, पुणे.




## लुब्ध वियोग

नोबेल पारितोषिक विजेते रशियन लेखक श्वान बुनिन यांच्या निवडक कथांचा अनुवाद.

संपादन : **डॉ. ए. चारुमती रामदास**
**डॉ. अनघा भट**

रोहन प्रकाशन, पुणे.

**किंमत : १२५ रुपये**

**पोस्ट खर्च वेगळा पाठवावा.**








## ऋतू-शैशव (अनेक छायाचित्रे व रेखाटनांसह)

भारतरत्न एम.एस. सुब्बलक्ष्मी, एम.एफ. हुसेन, केल्लुचरण महापात्रा, आर.के. लक्ष्मण, अमजद अली खान, विजय तेंडुलकर अशा सहा महान कलाकारांनी घेतलेला आपल्या बालपणाचा मागोवा


लेखिका : **गौरी रामनारायण** अनुवाद : **उल्का राऊत**

रोहन प्रकाशन, पुणे.

**किंमत : ९५ रुपये**

## लालबहादुर शास्त्री

- राजकारणातील मर्यादापुरुषोत्तम





तीस वर्षांनंतर दफ्तरमुक्त झालेल्या अनेक सत्यघटनांच्या आधारे लिहिलेले एक प्रभावी, प्रेरक आणि पारदर्शक चरित्र

**मूळ किंमत २५० रु. (जन्मशताब्दीनिमित्त विशेष सवलत आवृत्ती)**

लेखक : **सी.पी. श्रीवास्तव** अनुवाद : **अशोक जैन**

**किंमत : १०० रुपये**

रोहन प्रकाशन, पुणे.




## इंदिरा : इंदिरा नेहरू गांधी यांचे जीवनचरित्र


*'माझ्यावर दडपण आणू शकत नाही,*
*कोणतीही व्यक्ती नाही किंवा कोणतेही राष्ट्र.नाही.'*
**इंदिराजींचे एकमेव संपूर्ण संस्मरणीय जीवनचरित्र**

मूळ लेखिका : **कॅथरीन फ्रँक** अनुवाद : **लीना सोहोनी**

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

**किंमत : ४०० रुपये**

**पोस्ट खर्च वेगळा पाठवावा.**




## वाक्यकोश भाग १


विद्यार्थी, पालक आणि शिक्षक या साऱ्यांना इंग्रजी भाषेच्या व्यावहारिक वापरासाठी सुबोध मार्गदर्शक ठरणारा मराठी-इंग्रजी व्यावहारिक वाक्यकोश.

लेखक : **वामन केशव लेले**

राजहंस प्रकाशन, पुणे.

**किंमत : १०० रुपये**

## वाक्यकोश भाग २




पाच हजारांहून अधिक सहयोगी क्रियापदांचा समावेश असलेला, त्यांच्या स्पष्टीकरणासाठी मराठी वाक्ये आणि त्यांची इंग्रजी भाषांतरे यांनी परिपूर्ण असा ग्रंथ.

लेखक : **वामन केशव लेले**

**किंमत : २२५ रुपये**

राजहंस प्रकाशन, पुणे.




## मजेत जगावं कसं?

**एका महिन्यात तीन आवृत्त्या !!!**
अवघी जीवनशैली समृद्ध करणारं हे पुस्तक तुमच्या सुप्त शक्तींना चालना देईल.

लेखक : **शिवराज गोर्ले**


राजहंस प्रकाशन, पुणे.

**किंमत : २२५ रुपये**

**पोस्ट खर्च वेगळा पाठवावा.**








## जेआरडी- मी पाहिलेले


भारतातले अग्रगण्य उद्योगपती जेआरडी टाटा.
त्यांची निवृत्ती. काही अनुत्तरित प्रश्न.
काही शंका आणि काही साधार तर्क

लेखक : **डॉ. द. रा. पेंडसे**

राजहंस प्रकाशन, पुणे.

**किंमत : १७५ रुपये**

## हसरे दुःख




जीवनातल्या दुःखाचा वेध घेणाऱ्या मनस्वी कलावंताची कहाणी

लेखक : **भा. द. खेर**

**किंमत : २०० रुपये**

राजहंस प्रकाशन, पुणे.




## चंद्रमुखी


लाल दिवा आणि घुंगरांची गुंतावळ
यांची तुफान रशीली कहाणी

लेखक : **विश्वास पाटील**

राजहंस प्रकाशन, पुणे.

**किंमत : १७५ रुपये**

**पोस्ट खर्च वेगळा पाठवावा.**



## आकाशाशी जडले नाते


अनादिकालापासून माणसाला कोडी घालत आलेल्या आकाशाची अनोखी सफर

लेखक : **डॉ. जयंत नारळीकर**

राजहंस प्रकाशन, पुणे.

**किंमत : ८०० रुपये**

## शतक शोधांचे




विसाव्या शतकातील प्रभावी शास्त्रज्ञांची व अगणित शोधांची सचित्र ओळख

लेखक : **मोहन आपटे**

**किंमत : ९५० रुपये**

राजहंस प्रकाशन, पुणे.




## ऐसी प्रमेये रसिके

गणितासारखा किचकट विषय सोपा करून, समजावून देणारे, संख्यांचे गुपित उलगडून दाखवणारे रंजक पुस्तक

लेखक : **रवींद्र बापट**


राजहंस प्रकाशन, पुणे.

**किंमत : १७५ रुपये**

**पोस्ट खर्च वेगळा पाठवावा.**







## तेंडुलकरांच्या निवडक कथा


मानवी भावभावनांचे अनेक पदर उलगडून दाखवणाऱ्या वेधक, भेदक कथा

लेखक : **विजय तेंडुलकर**

राजहंस प्रकाशन, पुणे.

**किंमत : १५० रुपये**

## गोष्टी माणसांच्या





देशाच्या अत्यंत मागास प्रदेशातून भटकंती करीत असताना सुधा मूर्ती यांना भेटलेली माणसे, आणि आलेले अनुभव यांचे अस्सल मार्मिक चित्रण.

**मूळ लेखिका** : सुधा मूर्ती **अनुवाद** : लीना सोहोनी

**किंमत : १३० रुपये**

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.




## अंतर-पर्व

आपलं अनुभवविश्व अधिक संपन्न, श्रीमंत करणाऱ्या दर्जेदार रशियन कथांचा भावानुवाद

भावानुवाद : **डॉ. सुनीती अशोक देशपांडे**

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

**किंमत : १७५ रुपये**

**पोस्ट खर्च वेगळा पाठवावा.**

## नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके




**जीवनयात्रा :** अभिनेते, दिग्दर्शक मा. विनायक

भारतीय बोलपटांच्या इतिहासात सुरुवातीलाच आपला अमिट ठसा उमटवणारे कल्पक, प्रतिभासंपन्न दिग्दर्शक, अभिनेते मा. विनायक यांचे चित्रदर्शी आत्मीयदर्शन.

लेखक : **भाई भगत**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.** **किंमत : १५० रुपये**

आधुनिक भारताचे प्रेषित **: स्वामी विवेकानंद**



*'स्वामीजी म्हणजे विश्वात्म्याच्या वाद्यवृंदाने सादर केलेले उत्कृष्ट संगीत'* - प्रा. रोमा रोलानी स्वामीजींची अद्वितीय तेजोमयी जीवनगाथा

मूळ लेखक : **गौतम घोष** अनुवाद : **माधव मोर्डेकर**

**किंमत : १८० रुपये** **मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




**फिटे अंधाराचे जाळे**

आपल्या विकलांग मुलीच्या अपंगत्वावर मात करण्यासाठी तिच्या कुटुंबानं आणि तिनं शास्त्रशुद्ध उपचार, प्रचंड संयम, अखंड खटपट आणि दुर्दम्य जिद्द या हत्यारांनिशी दिलेली विलक्षण झुंज... यशाकडे कणाकणानं नेणारी...

लेखक : **भालचंद्र करमरकर**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.** **किंमत : १२० रुपये**

**पोस्ट खर्च वेगळा पाठवावा.**



## नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके




**ऑन द विंग्ज ऑफ ईगल्स**

इराणमध्ये डांबल्या गेलेल्या आपल्या दोन कर्मचाऱ्यांना सोडवण्यासाठी एका मालकाने केलेल्या भगिरथ प्रयत्नांची चित्तथरारक सत्यकहाणी.

मूळ लेखक : **केन फोलेट** अनुवाद : **ज्योत्स्ना लेले**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.** **किंमत : २५० रुपये**


**फ्रॉम रशिया विथ् लव्ह**




रशियाची गुप्तचर संघटना ब्रिटिशांचा जबरदस्त गुप्तहेर जेम्स बाँड याच्या हत्येचा कट आखते आणि...
**मराठीत आता येत आहे जेम्स बाँडचा झंजावात...**

मूळ लेखक : **इयान फ्लेमिंग** अनुवाद : **विजय देवधर**

**किंमत : २५० रुपये** **मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




भारतीय दांपत्यासाठी मार्गदर्शक
**प्रियाराधन आणि विवाह**


एकमेकांना अधिक 'समजून' घेण्यासाठी, आणि मतभेद नाहीसे होण्यासाठी पती व पत्नी दोघांसाठी रामबाण उपाय

मूळ लेखक : **डॉ. विजय नागस्वामी** अनुवाद : **भारती पांडे**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.** **किंमत : १५० रुपये**

**पोस्ट खर्च वेगळा पाठवावा.**

# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके




## ॲज आय सी

डॉ. किरण बेदी यांचे
विविध सामाजिक प्रश्नांवरील वैचारिक लेख

**डॉ. किरण बेदी** लेखिका : **माधुरी शानभाग**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.** **किंमत : २०० रुपये**

## गोष्ट हातातली होती!




वपु काळे यांच्या आत्तापर्यंत
पुस्तकरूपात प्रकाशित न झालेल्या
नव्या कथांचा संग्रह

लेखक : **वपु काळे**

**किंमत : १०० रुपये** **मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




## सामक्षा

आपल्याच कर्तृत्वानं सिद्ध होणं हे केवळ स्वतःचं असतं का?
इतरांच्या अस्तित्वाच्या क्लेशकारी संदर्भांमुळे
जीवन 'अवघड' बनलेल्या स्त्री-पुरुषांच्या आणि
मुलांच्या हृदयस्पर्शी कथा.

लेखक : **सुमेध वडावाला (रिसबूड)**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.** **किंमत : २०० रुपये**

**पोस्ट खर्च वेगळा पाठवावा.**